* नागपूर *

* वर्ष ५४ * अंक २२१ *

सोमवार, दिनांक १८ नोव्हेंबर २०२४

किंमत रु. २/- + वितरण खर्च रु. १/-

एकूण किंमत रु. ३/-

पुरवणीसह पाने ८

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com



## मुंबईत कोरोनाबाधितांचा मृतदेह ठेवण्याच्या बॅगमध्ये घोटाळा

## 7/11 ट्रेन बॉम्बस्फोट प्रकरणाचा कालक्रम

मुंबई: 11 जुलै 2006 रोजी मुंबईच्या उपनगरीय गाड्यांमध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोटात दोषी ठरलेल्या पाच जणांना विशेष न्याय... जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

## 26/11 Mumbai Terror Attack : सहा ठिकाणी हल्ले, 60 तास मृत्यूचे तांडव आणि 166 जणांचा जीव गेला; मुंबई हल्ल्याच्या 'त्या' दिवशी नेमकं काय घडलं?

▸ मुंबई (प्रतिनिधी):

## कोविड स्पाइक दरम्यान मुंबईने मोठ्या धार्मिक सणावर निर्बंध लादले आहेत

◆ (विशेष प्रति...

ऑक्टोबर २१, २०२१

## " गोवारी हत्याकांड, पालघर साधू हत्याकांड झालं त्यावेळेस कुठं होतं सरकार? " ;

"हा केवळ चौकश्यांवरुन महाराष्ट्राचे लक्ष विचलित करण्याचा नियोजित कार्यक्रम आहे.", असंही बोलून दाखवलं आहे.

पालघरच्या कासा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गडचिंचले गावाजवळ 16 एप्रिल 2020 रोजी चोर-दरोडेखोरांच्या अफवेतून चोर समजून...

## रेमडेसिवीरच्या काळाबाजार करणाऱ्या काँग्रेसच्या पदाधिकाऱ्याला पोलिसांनी रंगेहाथ पकडलं, पोलिसांनी कारवाई नेमकी कशी केली?

## १०० करोड़ की वसूली करनेवाली वसूली सरकार

बेफिकिरीने वाढवली रुग्णसंख्या

▸ मुंबई (प्रतिनिधी):

मनसुख ... सचिन वाझे ... भारतीय ज... विधिमंडळा...

## भ्रष्टाचाराचे आरोप: बीएमसी खरेदी, जंबो केअर सेंटर्स, मनुष्यबळ नियुक्तीचे ऑडिट करणार

BMC च्या दक्षता विभागाने सर्व वापरकर्ता विभागांना ऑनलाइन ऑडिटसाठी कोरोनाव्हायरसशी लढा देण्यासाठी घेतलेल्या खरेदी आणि सेवांशी

## 250 dead in Bombay serial blasts

BOMBAY—EVEN as this commercial capital of the nation was limping back to normalcy after the devastating riots of December and January, disaster has once again struck with over 250 people dying and at least 1,100 others being injured in well-planned serial bomb blasts in the afternoon on Friday. Police, hospital and other official sources said that the toll in the blasts, which occurred over 160 minutes and spread over a distance of 25 km, could be much higher as most of the injured in the hospitals had been critically wounded. The bombs went off at 13 different places, from outside the Air-India headquarters and the 29-storey-high stock exchange building in the downtown business area to some five-star hotels in the suburbs. The first bomb went off on a suburban train at Nerul, New Bombay, and ripped apart a first class compartment without casualties.

The Chief Minister, Mr Sharad Pawar, later told newsmen that in view of the meticulous plannin...

...the Army had been put on alert and tight security was being maintained throughout the city. He appealed to the people to stay calm and not pay heed to rumour-mongers. A huge electronic signboard was put up at the Churchgate Railway Terminus which screened messages of peace.

The Union Home Minister, Mr S.B. Chavan, and his Minister of State, Mr Rajesh Pilot, have rushed here. Mr ...

Pawar added that most of the bombs were concealed in cars in the basements of important buildings and five-star hotels.

Officials said the intensity of the blasts indicated that these were not explosives used in gang warfare or political clashes. Mr Pilot told Parliament that a nationwide alert had been sounded and that Mr Pawar had wanted reinforcements to be rushed from Delhi. In the Capital, Prime Minister P.V. Narasimha Rao appealed to ... to remain calm and said that he ... shocked and grieved."Mr Rao, who ... his tours to Himachal ...

...over the phone. The BJP leader Mr L.K. Advani, said that the Pakistani ISI may well be involved in the blasts.

According to the police, no incident of rioting had been reported from the city. Meanwhile both the national airlines had stopped accepting cargo and courier packets in Bombay until further notice.

According to stock exchange sources, trading will not take place for at least another four days. The England hockey team got an ugly welcome at the Sea Rock hotel when a bomb exploded shortly after their arrival for the twice postponed ...Gandhi Gold Cup tournament.

## पुणे बॉम्बस्फोटातील मृतांचा आकडा 17 वर

ऑगस्ट २५, २००३

## मुंबईतील साखळी स्फोटांमधील मृतांची संख्या 22 वर

## २००६ मुंबई ट्रेन बॉम्बस्फोट: 13 वर्षांनंतर आजही जखमा ताज्याच

१८ जानेवारी २०११

## सरकारची कर्जमाफी म्हणजे शेतकऱ्यांची दिवसाढवळा केलेली फसवणूक

## Antilia bomb threat: Did a PPE-clad man park explosive-laden SUV outside Ambani residence? CCTV emerges

Amid an ongoing investigation in connection with the Antilia bomb threat, a CCTV footage has emerged, showing a PPE-clad man walking on Mumbai roads late at night.


## महानगरपालिकेत कोट्यवधींचा रस्ते घोटाळा

## बीएमसी खिचड़ी घोटाला: मुंबई नगर निगम के खिचड़ी घोटाले में कई पहलू सामने आए

मुंबई नगर निगम में हुए खिचड़ी घोटाले में आर्थिक अपराध शाखा की जांच में कई पहलू सामने आए हैं. खिचड़ी बनाने वाली कंपनी के पास स्वास्थ्य विभाग से कोई लाइसेंस नहीं था. फिर भी उन्हें खिचड़ी का ठेका दिया गया.

## राहुल गांधींच्या आदेशावरून उद्धव ठाकरेंनी पालघर मॉब लिंचिंगचा सीबीआय तपास थांबवला

पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील गडचिंचाले गावात 16 एप्रिल 2020 रोजी दोन नाशिकस्थित साधू आणि त्यांच्या चालकाची निर्घृण हत्या करण्यात आली, मुंबईपासून सुमारे 120 किलोमीटर अंतरावर.




# म्हणूनच नको काँग्रेस

Published By: Bharatiya Janata Party, Maharashtra | C.D.O Barrack No. 1, Nariman Point, Mumbai- 400020

# व्यायामापेक्षा उत्तम शर्करारहित आहार अधिक महत्त्वाचा

**फक्त** शारीरिक मेहनत केल्यामुळे वजन कमी होत नाही. त्यामुळेच अनेक वर्ष व्यायाम करून देखील शरीराचा स्थूलपणा वाढण्याच्या घटना घडतच असतात. यामागचे छुप शत्रू म्हणजे अधिक प्रमाणात शर्करा आणि कर्बोदके असलेला आहार! एखादी व्यक्ती आहारापासून किती उष्मांक (कॅलरी) घेते याचा होणारा परिणाम स्थुलतेच्या पलीकडे जाणारा आहे. त्यामुळे शरीरात जाणाऱ्या कॅलरीवर नजर ठेवून वजन राखण्याचा दिला जाणारा संदेश अपयशी होताना दिसते. कारण व्यायाम केल्यास स्थूलपणा कमी होतो अशा चुकीच्या विधानावर लोक विश्वास करू लागतात. एका क्रीडा औषध विषयक ब्रिटीश जर्नलमध्ये अलीकडेच प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार व्यायामापेक्षा आहाराकडे लक्ष दिले पहिजे यावर वाद मंत-मतांरे झाली. लोक जो व्यायाम करतात त्यामुळे पूर्णपणे ते वजनावर नियंत्रण ठेवण्यास मदत मिळू शकत नाही किंवा आहारात शर्करा आणि कर्बोदके असल्यास ते सुदृढ राहू शकतात यावर वादावादी झाली. थोडक्यात काय, तर केवळ व्यायाम केल्याने वजन कमी होते हा विश्वास प्रकाशित झालेल्या अभ्यासाने खोडून काढला होता. कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रूग्णालयाच्या प्रमुख आहारतज्ज्ञ डॉ. भक्ती सामंत सांगतात की, नियमित व्यायाम करणारे आणि सामान्य वजन असणारे तसेच सुदृढ दिसणारे लोक चुकीच्या आहारामुळे-अधिक शर्करा आणि कर्बोदक असलेल्या आहारामुळे आजारी असू शकतात. यापैकी ४० टक्के लोक ज्यांच्या शरीराचे वजन प्रमाण (बॉडी मसाज इंडेक्स-बीएमआय) साचेबद्ध आहे अशांना स्थूलतेशी निगडीत आजार म्हणजे उच्च रक्तदाब, मेद संबधित विकार, फुगलेले यकृत, हृदय किंवा रक्त संबधित विकार (काडीओव्हस्क्यूलर) असू शकतात. शारीरिक मेहनतीशिवाय जर धुम्रपान आणि मद्यसेवनाच्या सवयीबरोबर आहार अयोग्य असेल तर विकार बळवण्याची शक्यतर असते. जर व्यायाम करत असाल तर जंक डाएट घेऊशकता, हा देखील एक गैरसमज आहे. आपल्या शरी-राला कोणत्या स्त्रोतातून कॅलरी मिळते ते देखील आवश्यक ठरते. उदा. जर शर्करायुक्त आहारातून उष्मांक मिळाला तर मेद आणि भूक बळावणार, मेदातून मिळणाऱ्या कॅलरीतून शरीराचा घेर वाढायला मदत होते. दर दिवशी जर एखादी व्यक्ती साखरेतून अतिरिक्त १५० कॅलरी घेत असेल तर तितक्याच पटीत मेदू आणि प्रथिने घेण्याच्या तुलनेत त्या व्यक्तीला टाईप-२मधमेह होण्याची भीती ११ टक्क्यांनी वाढते. त्यामुळे सहज उपलब्ध होणारे शर्करायुक्त पेयपदार्थ (ड्रिंक्स) घेताना पुन्हा-पुन्हविचार करावा. डॉ. भक्ती समांत पुढे मत मांडताना म्हणतात की, सार्वजनिक आरोग्यात सल्ला किंवा शिक्षणापेक्षा आहाराच्या सवयी बऱ्याच बदलल्या आहेत. एखाद्या व्यक्तीच्या आहारातून शर्करायुक्त आहार कमी केल्यास त्याच्या आरोग्यावर दीर्घकालीन सकारात्मक परिणाम दिसून येतात. तर काही उत्तम पर्याय म्हणजे कृत्रिम साखर (आर्टीफिशरयल स्वीटनर) उपलब्ध आहे, आपल्या दैनंदिन जेवणाची चव बिघडून न देता आणि प्रकृतीला हानी न पोहचवता हे स्वीटनर गोडी कायम ठेवतात. संपूर्ण नैसर्गिक पदार्थ चांगल्या आरोग्यासाठी लाभदायक आहे. बैठी जीवनशैली आणि स्थूलपणा यांच्या थेट संबंधाशी निगडीत गैरसमजाचा भांडाफोड झाला पाहिजे. अर्थात चुकीच्या आहारातून तुमची सुटका नाही. लोक अपायकारक खाऊन आरोग्यदायी होऊशकत नाहीत, याचा व्यायामाशी सुतराम संबध नाही. त्यामुळे जर तुम्ही तुमच्या शरीरावीर प्रेम करत असाल तर शर्करा आणि कार्बोदकांचे प्रमाण कमी करा.

**शारीरिक मेहनतीशिवाय जर धुम्रपान आणि मद्यसेवनाच्या सवयीबरोबर आहार अयोग्य असेल तर विकार बळवण्याची शक्यतर असते. जर व्यायाम करत असाल तर जंक डाएट घेऊ शकता, हा देखील एक गैरसमज आहे. आपल्या शरीराला कोणत्या स्त्रोतातून कॅलरी मिळते ते देखील आवश्यक ठरते. उदा. जर शर्करायुक्त आहारातून उष्मांक मिळाला तर मेद आणि भूक बळावणार, मेदातून मिळणाऱ्या कॅलरीतून शरीराचा घेर वाढायला मदत होते. दर दिवशी जर एखादी व्यक्ती साखरेतून अतिरिक्त १५० कॅलरी घेत असेल तर तितक्याच पटीत मेदू आणि प्रथिने घेण्याच्या तुलनेत त्या व्यक्तीला टाईप२ मधमेह होण्याची भीती ११ टक्क्यांनी वाढते. त्यामुळे सहज उपलब्ध होणारे शर्करायुक्त पेयपदार्थ (ड्रिंक्स) घेताना पुन्हापुन्हा विचार करावा. डॉ. भक्ती समांत पुढे मत मांडताना म्हणतात की, सार्वजनिक आरोग्यात सल्ला किंवा शिक्षणापेक्षा आहाराच्या सवयी बऱ्याच बदलल्या आहेत.**



# कासव होणार नामशेष ?

**तीन** वर्षापूर्वी लॉन्सम जॉर्ज नावाच्या एका कासवाचा मृत्यु झाला. पिंटा आयलंड जायंट या प्राजातीतील ते अखेरचे कासव होते. या प्रजातीतील हे एकटेच कासव असल्याने त्यांची अखेर झाल्यावर ही प्रजातीच नष्ट झाली. कासवांच्या अनेक प्रजाती अशातऱ्हेने नष्ट होण्याच्या मार्गावर आल्याची चिंता वन्यप्राण्यांना अभ्यास करणाऱ्या इंडेन्जर्ड वाईल्डलाईफ ट्रस्ट या संस्थेने व्यक्त केली आहे. जायंट सॉफ्ट शिल्ड टर्टल या प्रजातीतील चारच कासवे उरली आहेत. ही प्रजात गोड्या पाण्यात प्रामुख्याने आढळते. कासव नष्ट होऊलागल्याची अनेक कारणे आहेत. त्यांची खाण्यासाठी, जादुटोण्यासाठी शिकार केली जाते. त्यांची तस्करीही मोठ्या प्रमाणावर होते. भारतात कासवाच्या सर्वाधिक प्रजाती आहेत, त्याही नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. भारतीय वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार कासव खाणे, पकडणे, विकणे , विकत घेणे किंवा पाळणे बेकायदेशीर आहे. तरीही कासवांचा मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर व्यवहार होतो. प्रदूषण आणि निवास्थाने संपुष्टात आल्यानेही कासवांची मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर व्यवहार होतो. प्रदुषण आणि निवास्थाने संपुष्टात आल्यानेही कासवांची संख्या कमी होत आहे. नैसर्गिकदृष्ट्या कासवाचे प्रजनन होण्याचा काळ दीर्घ असतो. कासवांना लैंगिकदृष्ट्या परिपक्व होण्यास दहा ते तीस वर्षाचा कालावधी लागतो. कासवाच्या तस्करीला आळा घालण्याची गरज आहे. नाही तर भारतातील कासवांच्या प्रजाती नष्ट होतील, अशी भीती तज्ज्ञांना वाटत आहे.



# पित्तनाशक जांभूळ

**अवीट** गोडी असणारं हे फळ खाण्यातली मजा काही न्यारीच आहे. त्याचवेळी आरोग्यासाठीही हे फळ अतिशय उपयुक्त आहे. जांभळामुळे पित्त कमी होते. थकवा दूर होतो. शिवाय तहानही भागते. जांभळाच्या झाडाची पाने आणि सालही विविध रोगांवर उपयोगी आहे.

तापामुळे पचन नीट होत नसेल तर, चमचे जांभळाच्या पानांचा रस घ्यावा. त्यामुळे पोटाला आराम मिळतो.

पित्तामुळे उलटी होत असल्यास जांभळाची दोन ते तीन हिरवी पाने पाण्यात उकळून व गाळून घ्यावीत. त्यानंतर मधासोबत घेतल्यास पित्तशमन होते.

शरीराला जखम झाल्यास वा खरचटल्यास जांभळाची पाने लावावीत. त्यामुळे रक्त थांबते.

दातातून रक्त येत असल्यास जांभळाची सालं बारीक करून त्यांचे मंजन करावे आणि दातांना लावावे. त्यामुळे दात दुखीला उतारा मिळतो.

हाता पायांची जळजळ होत असल्यास पिकलेल्या जांभलाचा रस लावावा. नक्की फरक पडतो.

पिकलेल्या जांभळाला सेंधव लावून त्याला तीन ते चार तास ठेवावे. त्यानंतर ते मळून घ्यावे. मग कपड्यात बांधून टांगून ठेवावे. यातून निघणाऱ्या रसाचे वीस ते तीस थेंब एक चमचा पाण्यात मिसळून घेतल्यास हगवण थांबते. शिवाय भूक लागते. यात मीठ थोडे जास्त घातल्यास बराच काळ टिकते. त्याला थोड्या काळानंतर उन दाखवावे. म्हणजे ते खराब होत नाही.



# वॉशिंग मशीनची काळजी घ्या

**प्रत्येक** घरातील अत्यंत सोयीचे उपकरण आहे वॉशिंग मशीन. मशीन आपला वेळ आणि मेहनत वाचवते म्हणून आपणही तिची थोडीशी काळजी घेतली तर मशीन वर्षोनुवर्ष सर्व्हिस देत राहील.

* वॉशिंग मशीनबाबत काही माहीत नसल्यास त्यासोबत आलेल्या सूचना वाचा आणि त्याप्रमाणेच वापर करा.



* सेमी ऑटोमॅटिक मशीनमध्ये कपडे धुऊन झाल्यावर घाण पाणी लगेच ड्रेन करा. खूप वेळ पाणी मशीनमध्ये राहील्यावर त्यातून दुर्गंध येते.

* कपडे धुऊन झाल्यावर मशीनचे झाकण उघडे ठेवा. याने मशीन पूर्णपणे कोरडी होते आणि त्यातून दमट वास येत नाही.

# प्रेग्नेंसीमध्ये या गोष्टींकडे लक्ष्य ठेवा

**प्रत्येक** महिलेसाठी सर्वात महत्त्वाचे सुख म्हणजे तिचे आई होणे असते. गर्भावस्थे दरम्यान आईच्या आरोग्याचा प्रभाव होणाऱ्या बाळावर देखील पडतो. म्हणून या काळात मातेला आपल्या आरोग्याची काळजी घेणे फारच गरजेचे आहे. खानपानाशिवाय बऱ्याच अशा गोष्टी आहेत ज्या गर्भस्थ शिशुवर प्रभाव टाकते. आम्ही तुम्हाला अशा काही खास गोष्टी सांगत आहोत ज्या गर्भावस्थादरम्यान प्रत्येक आईसाठी उपयोग ठरेल.

१. गर्भधारणाच्या वेळेस प्रत्येक आईला ब्लड ग्रुप, विशेषकर आर. एच फैक्टरची चाचणी करून घ्यायला पाहिजे. त्याशिवाय हीमोग्लोबिनची देखील चाचणी वेळो वेळी डॉक्टरच्या सल्ल्यानुसार करायला पाहिजे.

२. जर तुम्ही आधीपासुनच एखाद्या आजारपणाचे शिकार असाल जसे मधुमेह, उच्च रक्तचाप इत्यादी तर गर्भावस्था दरम्यान नेमाने औषध घेउन या आजारांवर नियंत्रण ठेवावे. या बाबतीत आपल्या डॉक्टरचा सल्ला अवश्य घ्यावा.

३. गर्भावस्थेच्या प्रारंभिक दिवसांमध्ये जीव घाबरणे, उलट्या होणे, रक्तदाब सारख्या समस्या असू शकता, अशात डॉक्टरकडून चेकअप जरून करवून घ्यावा. गर्भावस्थे दरम्यान पोटात दुखणे आणि योनीतून रक्तस्राव सुरू झाल्यास तर त्याच्याकडे गंभीरतेने बघावे आणि त्वरीत डॉक्टरांची भेट घ्यावी.

४. गर्भावस्थेत डॉक्टरांच्या सल्ल्या बिना कुठलेही औषध घेऊ नये. गर्भावस्थे लागणारे आवश्यक इंजक्शन घ्यावे आणि आयरनच्यांचे सेवन केले पाहिजे. चेहरा किंवा हात-पायातयेणारी असामान्य सूज, डोकेदुखी, डोळ्यातून धुंधला दिखना आणि मूत्र त्याग करताना अडचण येत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नये.

५. गर्भधारणाच्या दरम्यान निर्धारित कॅलोरी आणि पौष्टिक आहार घेणे फारच गरजेचे आहे, जसे धान्य, भाज्या, फळ, बगैर फॅट्सचे मटण, कमी वसेयुक्त दुध, नारळ पाणी इत्यादी.

६. गर्भावस्थेत जास्त प्रमाणात फोलिक एसिड, आयरन, कॅल्शियम, विटामिन ए आणि बी-१२ असणाऱ्या पदार्थांचे सेवन केले पाहिजे. गर्भावस्थेत पर्याप्त मात्रेत पाणी प्यायला पाहिजे.

७. तैलीय पदार्थांचे सेवन कमी करायला पाहिजे. गर्भावस्थेत सिगारेट आणि दारू सारख्या पदार्थांचे सेवन करणे टाळावे. या दरम्यान जूस, सलाड, सूप इत्यादि तरळ पदार्थांचे सेवन अधिक मात्रेत करायला पाहिजे.

८. गर्भावस्थेत हलके आणि ढगळे कपडे घालायला पाहिजे. कुठल्याही प्रकारचे शारीरिक जोखिम असलेले कार्य करू नये, तसेच भारी सामान देखील उचलताना सावधगिरी बाळगावी.

९. हे सर्व टीप्स सामान्य गर्भावस्थेसाठी सांगण्यात आले आहेत. या बाबतीत आपल्या डॉक्टरांचा सल्ला आवश्यक घ्यावा.

**गर्भधारणाच्या वेळेस प्रत्येक आईला ब्लड ग्रुप, विशेषकर आर. एच फैक्टरची चाचणी करून घ्यायला पाहिजे. त्याशिवाय हीमोग्लोबिनची देखील चाचणी वेळो वेळी डॉक्टरच्या सल्ल्यानुसार करायला पाहिजे. २. जर तुम्ही आधीपासुनच एखाद्या आजारपणाचे शिकार असाल जसे मधुमेह, उच्च रक्तचाप इत्यादी तर गर्भावस्था दरम्यान नेमाने औषध घेउन या आजारांवर नियंत्रण ठेवावे. या बाबतीत आपल्या डॉक्टरचा सल्ला अवश्य घ्यावा.**



Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

* वर्ष ५४ * अंक २२१ * * नागपूर * | सोमवार, दिनांक १८ नोव्हेंबर २०२४ | ८ पाने • किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

अग्राग्रलेख

## खरीखरी...

## आज सायंकाळी पाच वाजता

महाराष्ट्राच्या निवडणूक इतिहासातील सर्वात वेगवान घडामोडींची सांगता आज सायंकाळी पाच वाजता होणार आहे. गेले पंधरा दिवस काही मोठ्या नेत्यांच्या छोट्या सभा, तर काही छोट्या नेत्यांच्या मोठ्या सभा जनतेने अनुभवल्या. पक्ष आणि विपक्ष दोन्ही आक्रमकपणे आपापल्या उमेदवाराच्या प्रचारासाठी हेलिकॉप्टरने धाव-धाव धावले. ही आताची निवडणूक देशातील सर्वात महागडी निवडणूक ठरेल असे दिसते. आतून पोकळ असले तरी महाराष्ट्र हे श्रीमंत राज्य आहे. अशी देशाची धारणा आहे. पण ही श्रीमंती फक्त मुंबईत ओसंडून वाहत असते. त्या श्रीमंतीचा थोडा बहुत भाग पुणे, नागपूर, संभाजीनगर, नाशिक वगैरे सारख्या भागात दिसत असतो. पण महाराष्ट्रामधून मुंबई वजा केली. तर महाराष्ट्रही इतर राज्यासारखा गरीब प्रदेश आहे, याची प्रचिती आपल्याला येत असते. देशातील गडगंज संपत्ती असलेले अनेक श्रीमंत मुंबईत राहतात. यामुळेच मुंबईतील जमिनीचे भाव गगनभेदी आहेत. आपल्या देशाची राजधानी दिल्ली असली तरी दिल्लीवर राज्य करते ती मुंबईच. 'ज्याच्या हाती मुंबईची दोरी, त्याचीच चालते आर्थिक मुजोरी' अशी अवस्था आहे. एकेकाळी मुंबईला जाऊन येणे म्हणजे विदेशात जाऊन येण्याप्रमाणे वाटत असे. पण या मुंबईची भरभराट इंग्रजांच्या आमदनीत झाली हे मान्य केले पाहिजे. कापडाच्या गिरण्या ही या शहराची ओळख होती. आता गिरणगाव नावापुरतेच शिल्लक उरलेले आहे. इतरही अनेक महत्त्वाची केंद्रे आणि संस्था मुंबईत आहेत. मुंबईच्या या वैशिष्ट्याचे मोठे कारण म्हणजे मुंबईचा समुद्र किनारा आहे. या किना?यावरून वषार्नुवर्षं कोट्यावधी रुपयांची उलाढाल आणि व्यापार होत असतो. यामुळे अशा या मुंबईवर आपला अंमल राहावा. असे केंद्रातील प्रत्येक सत्ताधारी पक्षाला वाटत असते. आताही आपल्या राज्यात एनडीए आणि इंडिया असा सामना अत्यंत जोमाने सुरू आहे. आमच्या आजच्या घडीला प्रचाराच्या बाबतीत, साधन संपत्तीच्या बाबतीत एनडीए वरचढ आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ याच महाराष्ट्रात आहे. संघाचा विस्तार आज संपूर्ण भारतात आहे. संघाला पुढच्या वर्षी 100 वर्षे पूर्ण होत आहेत. अशावेळी ज्या महाराष्ट्रात संघाचे मुख्यालय आहे. त्या महाराष्ट्रावर संघानुकूल सरकारचा अंमल असावा, असे वाटणे स्वाभाविक आहे. संघामुळेच हरियाणात एनडीएची हरीभरी झाली. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातही संघाचे स्वयंसेवक समर्पित भावनेने आपली सेवा अर्पित करीत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि केंद्रातील इतर महत्त्वाचे बडे बडे नेते, अनेक राज्यांचे मुख्यमंत्री यांनी एनडीएच्या प्रचारासाठी जिवाचे रान केलेले आहे. तिकडे महाविकास आघाडी प्रचारासाठी राहुल गांधीच्या नेतृत्वाखाली, शरद पवार यांच्या कर्तृत्वाखाली आणि उद्धव ठाकरे यांच्या वक्तृत्वाखाली मतदारांना पटवण्याचे कार्य करीत आहे. अशा प्रकारे सर्व वेगवेगळ्या मार्गांचा अवलंब करून सत्ता काबीज करण्यासाठी दोन्ही पक्ष मैदानात उतरलेले असताना, इतर लहान मोठ्या आघाड्या आणि पक्ष तसेच अपक्ष उमेदवार यांचाही बोलबाला आहे. मोठ्या पक्षांचे बंडखोर त्या पक्षांसाठी डोकेदुखी ठरणार आहेत. एकूणच ही निवडणूक सर्वच पक्षांची परीक्षा घेणारी आहे. या परीक्षेत कोणाला मेवा मिळतो आणि कुणाला पुन्हा वाट पाहावी लागते. हे उद्याचा प्रचार थांबल्यावर दोन दिवसांनी मतदान आणि त्यानंतर तीन दिवसांनी निकाल लागल्यावर कळेलच. एकूणच गेले पंधरा दिवस महाराष्ट्रात निवडणुकीचा ज्वर जोरात चालू असल्याचे चित्र आहे. घोडा मैदान जवळ आहे. तेव्हा प्रत्येक उमेदवाराने आपल्या श्रद्धेप्रमाणे आपल्या श्रद्धास्थानाला वंदन करावे आणि नंदनवनाची अपेक्षा ठेवावी. आमच्या सर्वांना शुभेच्छा !

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## त्यांची राजकीय कारकीर्द गद्दारीची

■ वृत्तसंस्था, अकोले, दि. १७ :
मंत्री धनंजय मुंडे यांनी पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर टीका केली आहे. अहिल्यानगर येथील अकोले येथे आयोजित सभेत बोलताना मुंडे म्हणाले, त्यांची राजकीय कारकीर्द विश्वासघाताची आणि गद्दारीची राहिली आहे, असे नाव न घेता शरद पवारांवर टीका केली आहे.

# मी शर्यतीत नाही...

## मुख्यमंत्रीपदावरून शिंदेंची स्पष्टोक्ती एक है तो सेफ है चे समर्थन



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :
महाराष्ट्रात मतदानाच्या दोन दिवस आधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपण मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत नसल्याचे सांगितले.

एका वृत्तवाहिनीशी बोलताना ते म्हणाले की, मुख्यमंत्री महायुतीचाच होणार हेही निश्चित आहे. एक दिवसापूर्वी, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही एएनआयशी बोलताना असेच म्हटले होते.

मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले की, काँग्रेसचे धोरण फोडा आणि राज्य करा. राहुल गांधी बाळासाहेब ठाकरे यांना हिंदुहृदयसम्राट कधी म्हणणार? शिंदे म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे म्हणायचे की मी माझ्या पक्षाची काँग्रेस कधीच होऊ देणार नाही, पण उद्धव ठाकरे स्वतःच्या स्वाथासाठी आणि मुख्यमंत्री होण्यासाठी काँग्रेससोबत गेले. शिंदे यांनीही पंतप्रधान मोदींच्या 'एक हैं तो सेफ हैं' या घोषणेचे समर्थन केले.

## राज्यात केवळ अदानी सेफ

### प्रियांका गांधींचा सरकारवर हल्लाबोल



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर / गडचिरोली, दि. १७ :
सरकार जनतेला उत्तरदायी असते, पण भाजपने मागील १० वर्षांपासून ही परंपरा मोडीत काढली आहे. एक है तो सेफ है च्या घोषणा दिल्या जातात, पण मोदींच्या राज्यात केवळ अदाणी हेच सेफ आहेत, अशी टीका काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी केली.

अडीच वर्षात लाडकी बहीण दिसली नाही, पण निवडणुकीच्या तोंडावर बहिणींची आठवण झाल्याचे प्रियांका गांधी म्हणाल्या. त्या गडचिरोली येथे आयोजित सभेत बोलत होत्या.

प्रियांका गांधी म्हणाल्या, भाजपचे नेते शिवाजी महाराजांचे नाव घेऊन मोठमोठ्या बाता करतात. तसेच शिवाजी महाराजांचा अपमान करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ७ वर्षांपूर्वी अरबी समुद्रात शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे उद्घाटन केले होते. परंतु, अद्याप काम सुरू केले नाही. महायुती सरकार केवळ घोषणा करणारे सरकार असल्याचे त्या म्हणाल्या.

एक है तो सेफ अशा घोषणा दिल्या जात आहे. मोदींच्या राज्यात केवळ अदाणी हेच सेफ आहेत. भाजप सरकारच्या काळात शेतकरी, मजूर, महिला आणि उद्योग सुरक्षित नाहीत. केवळ पोकळ घोषणा केल्या जातात. काँग्रेस सरकारने कर्नाटक, तेलंगणा, हिमाचल प्रदेश मध्ये दिलेली गॅरंटी पूर्ण केली. निवडणुका जवळ आल्यावर मुख्य मुद्द्यांवरून जनतेचे लक्ष विचलित केले जाते.

गेल्या १० वर्षात महागाई प्रचंड वाढली आहे. जीएसटीमुळे छोटे दुकानदार, व्यावसायिक त्रस्त झाले आहेत. सरकारी परीक्षांमध्ये घोटाळे होत आहेत. राज्यात अडीच लाख पदे रिक्त असून ते भरले नाहीत. महाराष्ट्रात तरुणांच्या सर्वाधिक आत्महत्या होत असल्याचा दावा प्रियांका गांधी यांनी केला.

**प्रियांका गांधी यांच्या नागपूर येथील रोडमध्ये मोठा राडा....**

सविस्तर वृत्त पान ८ वर

## विदर्भातील सर्व सभा रद्द करून अमित शहा दिल्लीला रवाना



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :
विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या अंतिम टप्प्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या रविवारी नागपूर जिल्ह्यातील काटोल, सावनेरसह विदर्भात गडचिरोली व वर्धा या ठिकाणी जाहीर सभा आयोजित करण्यात आल्या होत्या.

मात्र चारही सभा रद्द करुन अमित शहा तातडीने रविवारी सकाळी दिल्ली रवाना झाले. मणीपूर येथे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे ते दिल्लीला गेल्याचे सांगण्यात येत आहे.

अमित शहा यांचे शनिवारी रात्री नागपुरात आगमन झाले. त्यांचा खाजगी हॉटेलमध्ये मुक्काम होता. मात्र रविवारी सकाळी शहा यांच्या विदर्भातील चारही सभा झाल्याचे भाजपकडून सांगण्यात आले. यामुळे उमेदवार निराश झाले आहेत.

## ६७ हजार स्त्रियांवर अत्याचार तर ६४ हजार महिला बेपत्ता

### शरद पवारांचा गंभीर आरोप



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १७ :
विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी महिलांवरील झालेल्या अत्याचारांची थेट आकडेवारीच सांगत भाजप महायुतीवर टीका केली.

शरद पवार म्हणाले, राज्यात भाजपचे सरकार आल्यावर 67,381 महिलांवर अत्याचार झाले. रोज पाच स्त्रियांवर अत्याचार होत होता. महिला बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढलं होतं. राज्यात 64 हजार महिला बेपत्ता झाल्या असल्याची माहिती शरद पवारांनी दिली आहे.

लाडक्या बहिणींना अर्थसहाय्याची नाही तर संरक्षणाची आवश्यकता आहे. दर तासाला पाच महिलांच्या अत्याचाराच्या घटना आज पोलिस स्टेशनमध्ये येत आहेत. या सरकारच्या कालखंडामध्ये 20 हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. महिला, शेतकरी आणि तरुणांमध्ये अस्वस्थता आहे. विद्यार्थ्यांनी शिकल्यानंतर नोकरीसारखा प्रश्न आज गंभीर झालेला आहे. चित्र असे दिसत आहे की मुलांना नोकरी मिळत नाही, त्यांच्यामध्ये निराशा होत आहे.

शरद पवार पुढे बोलताना म्हणाले, मध्यंतरी देशाच्या लोकसभेची निवडणूक झाली, आता विधानसभेची निवडणूक आहे. या निवडणुकीमध्ये महाराष्ट्राचा कारभार कोणाच्या हातामध्ये द्यायचा? याचा निकाल आपल्या सगळ्यांना घ्यायचा आहे. ज्यांच्या हातामध्ये आपण महाराष्ट्राची सत्ता दिली त्यांचा पाच वर्षांचा अनुभव बघितला तर आज इथे सत्तेमध्ये बदल केल्याशिवाय पर्याय आपल्या सगळ्यांसमोर नाही.

## उबाठा सेनेचा सवता सुभा

### दै. महासागरच्या बातमीची संपूर्ण महाराष्ट्रभरात चर्चा

■ महाविकास आघाडीमध्ये असूनही

## उबाठा सेनेचा सवता सुभा




महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १७ :
काल दैनिक महासागर मध्ये ठळकपणे प्रकाशित करण्यात आलेल्या 'मविआमध्ये असूनही उबाठा सेनेचा सवता सुभा' या बातमीने संपूर्ण महाराष्ट्रभरात चर्चेला उधाण आले होते. यामध्ये उद्धव ठाकरे यांची सेना शांतपणे एकला चलोच्या भूमिकेत आहे का? याविषयी काही उदाहरणासह विश्लेषणात्मक वृत्त प्रकाशित करण्यात आले.

ऐन विधानसभा निवडणुकीचे मतदान जवळ आलेले असताना महाविकास आघाडीत सारे काही आलबेल नाही. दैनिक महासागरच्या शोध प्रतिनिधीने याबाबत सविस्तर विश्लेषणात्मक वृत्त काल ठळकपणे प्रसारित केले. वर्तमानपत्रातील जाहिराती पासून महाविकास आघाडीतील समन्वयांमध्ये अभाव असल्याची खात्रीशीर माहिती आणि त्याची कारण मीमांसा या वृत्तामध्ये करण्यात आली होती. हे वृत्त दैनिक महासागरच्या वाचकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. सोशल मीडियावर बऱ्याच लोकांनी हे वृत्त इतरांना फॉरवर्ड केल्याची खात्रीशीर बातमी आहे.

मुंबई ठाणे पालघर नाशिक यासह विदर्भ, मराठवाडा आणि नागपूर शहरात आज दिवसभर याच बातमीची चर्चा होती. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला राष्ट्रवादी आणि काँग्रेस पक्षाची मते नको आहेत का? असा प्रश्नही वृत्तामध्ये विचारण्यात आला होता. विशेष म्हणजे वरिष्ठ राजकीय वर्तुळातील बऱ्याच नेत्यांनी या बातमीच्या वृत्ताला खाजगीत दुजोरा दिल्याचे सांगितले जात आहे.

## मणिपूरमध्ये हिंसाचार, परिस्थिती चिघळली

## आमदारांच्या घरांवर हल्ला




■ वृत्तसंस्था, इंफाळ, दि. १७ :
मणिपूरमध्ये पुन्हा परिस्थिती बिघडली आहे. या पार्श्वभूमीवर गृहमंत्री अमित शहा नागपुरातील चार सभा रद्द करून दिल्लीला परतले आहेत. ते राज्यातील सुरक्षा व्यवस्थेबाबत बैठक घेणार आहेत.

मणिपूरमध्ये एक महिला आणि दोन मुलांचे मृतदेह सापडल्यानंतर हिंसक निदर्शने सुरू आहेत. मुख्यमंत्री एन बिरेन सिंह आणि १० आमदारांच्या घरांवर हल्ला करण्यात आला. बिघडलेली परिस्थिती पाहता ५ जिल्ह्यांमध्ये संचारबंदी लागू करण्यात आली आहे. त्याचबरोबर ७ जिल्ह्यांमध्ये इंटरनेट बंद करण्यात आले आहे.

दरम्यान, काही मंत्र्यांसह भाजपच्या १९ आमदारांनी पंतप्रधान कार्यालयाला (पीएमओ) पत्र लिहून बीरेन सिंह यांना हटवण्याची मागणी केली आहे. येत्या दोन-तीन दिवसांत परिस्थिती आणखी बिघडल्यास राज्यात राष्ट्रपती राजवट लागू होऊ शकते.

शनिवारी जिरीबाम येथील बराक नदीच्या पात्रातून दोन महिला आणि एका मुलाचे मृतदेह सापडले. जिरीबाम येथून कुकी अतिरेक्यांनी त्यांचे अपहरण केल्याचा संशय आहे. त्याच दिवशी सुरक्षा दलांनी १० बंदूकधारी अतिरेक्यांना ठार केले होते. शुक्रवारी रात्री एक महिला आणि दोन मुलांचे मृतदेह आढळून आले. निदर्शनांमुळे पाच जिल्ह्यांमध्ये संचारबंदी लागू करण्यात आली आहे.




## स्वदेशी हायपरसॉनिक क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी



■ वृत्तसंस्था
भुवनेश्वर, दि. १७ :
डिफेन्स रिसर्च डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशनने शनिवारी रात्री लांब पल्ल्याच्या हायपरसॉनिक क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली. त्याचा व्हिडिओ शेअर करताना, सांगितले की, अब्दुल कलाम आझाद बेट क्षेपणास्त्र ओडिशाच्या किनाऱ्याजवळ एका ग्लाइडेड वाहनाने सोडण्यात आले. क्षेपणास्त्राच्या उड्डाण मागार्चा मागोवा घेतल्यानंतर, चाचणी यशस्वी मानली जात आहे.

या लांब पल्ल्याच्या हायपरसॉनिक क्षेपणास्त्राची पल्ला 1500 किलोमीटरपेक्षा जास्त आहे. या क्षेपणास्त्राद्वारे शत्रूवर हवा, पाणी आणि जमीन या तिन्ही ठिकाणांहून हल्ला केला जाऊ शकतो. प्रक्षेपणानंतर, त्याचा वेग 6200 किलोमीटर प्रति तासापर्यंत पोहोचू शकतो.

## दादा म्हणतात, मी काकांना सोडले नाही..

### निवडणुकीच्या तोंडावरच अजित पवारांचे मोठे विधान : राजकीय वर्तुळात चर्चेला उधान



■ वृत्तसंस्था, बारामती, दि. १७ :
विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने एका सभेत बोलताना अजित पवारांनी एक विधान केले होते. अजित पवार म्हणाले होते, काहींना वाटते की मी साहेबांना सोडायला नको होते. पण मी साहेबांना सोडलेले नाही, असे सूचक विधान त्यांनी केले आहे. त्यामुळे या विधानाची सध्या राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

अजित पवार म्हणाले, तुम्हाला काहींना वाटत असेल की साहेबांना सोडायला नको होते. मित्रांनो मी साहेबांना सोडलेले नाही. मी साहेबांना सांगत होतो की सर्व आमदारांचे मत होते. माझ्या एकट्याचे मत नव्हते. सर्व आमदारांच्या सह्या आहेत. सर्वांचे मत होते की सरकारमध्ये जावे. आता सरकारमध्ये का जायचे? तर कामाला स्थगिती आली होती. आज या ठिकाणी बसलेल्यांपैकी संभाजी आणि राजवर्धन यांना विचारा. आपण मंजूर केलेल्या कामांना स्थगिती आली होती. तेव्हा म्हंटले हे तर तापच झाला. लोक मला तर वेड्यात काढतील कारण पैसे पाठवले आणि स्थगिती दिली. आता ती स्थगिती मी नव्हती दिली. तेव्हा मी विरोधी पक्षनेता होतो. स्थगिती सरकारने दिली होती, असे स्पष्टीकरण अजित पवारांनी दिले आहे.

दरम्यान, या विधानसभा निवडणुकीत अजित पवार यांच्या विरोधात बारामती विधानसभा मतदारसंघातून त्यांचे पुतणे युगेंद्र पवार हे निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे बारामतीमध्ये एकाच कुटुंबातील दोन उमेदवार निवडणुकीत एकमेकांच्या विरोधात उभे आहेत. त्यामुळे ही लढाई पवार कुटुंबियांच्या प्रतिष्ठेची मानली जात आहे.

युगेंद्र पवार यांच्याकडून जोरदार प्रचार सुरू आहे. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या देखील प्रचार सभा सुरू आहेत. बारामतीमधून कोण निवडून येणार याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. युगेंद्र पवार यांना शरद पवारांचा पाठिंबा असल्याने याचा फायदा त्यांना निवडणुकीत होणार का? तसेच बारामतीमध्ये अजित पवारांचे वर्चस्व असल्याने पुन्हा एकदा त्यांनाच आमदारकी मिळणार असे प्रश्न सध्या उपस्थित होत आहेत. आता काही दिवसांतच याचा निकाल म्हणजे 23 तारखेला विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होईल, त्याची उत्सुकता सर्वांना असल्याचे दिसून येत आहे.




औरंगाबाद पश्चिम मतदारसंघामध्ये आमने-सामने असलेल्या शिवसेनेच्या दोन्ही उमेदवारांचा प्रचार चांगलाच वेगात आला असून लढत सरळ असली, तरी मतदारांचा कल कुणाकडे राहील हे सांगणे अवघड आहे. येथे शिवसेनेच्या शिंदे गटाचे प्रवक्ते संजय शिरसाट यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

# संजय शिरसाट यांची प्रतिष्ठा पणाला


संजय शिरसाट राजू शिंदे

**लक्षवेधी लढत**

औरंगाबाद पश्चिम या मतदारसंघामध्ये शिवसेना (शिंदे) पक्षाचे संजय शिरसाट आणि शिवसेना (ठाकरे) पक्षाचे राजू शिंदे यांच्यामध्ये लढत होत आहे. त्यात रिपाइं (डेमो.) पक्षाचे रमेश गायकवाड हा तिसरा कोन असून त्यामुळेच शहरी आणि ग्रामीण असा मतदार असलेल्या या मतदारसंघामध्ये चुरस बघायला मिळत आहे. पश्चिममध्ये महापालिकेचे ३४ वार्ड आणि बजाजनगर, वडगाव कोल्हाटी, दौलताबाद आणि पंढरपूर असे जिल्हा परिषदेचे चार गण मिळून हा मतदारसंघ बनला आहे. कामगार वर्गाशिवाय शेतकरी, नोकरदार वर्ग असलेला शहरातील हा एकमेव मतदारसंघ सर्वाधिक मतदार असलेला मतदारसंघ म्हणूनही ओळखला जातो. शिरसाट यांची ही चौथी निवडणूक आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून त्यांनी मतदारसंघामध्ये आणलेला आठशे कोटी रुपयांचा निधी आणि केलेली कामे या जोरावर आपण विजयी होऊ, असा त्यांचा दावा आहे. दुसरीकडे, २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपमधून बंडखोरी करत अपक्ष म्हणून लढलेल्या राजू शिंदे यांचा शिरसाट यांनी पराभव करत सलग तिसऱ्यांदा चौथ्यांदा हा मतदारसंघ शिवसेनेकडे राखला होता. या वेळी शिंदे त्यांनी ठाकरे यांच्या शिवसेनेकडून उमेदवारी मिळवली आहे. शिंदे यांनी आपल्या प्रचारात करणार असलेली विकासकामे आणि लोकांना हवा असलेला बदल यावर भर दिला आहे. असे असले तरी महाविकास आघाडीतील अन्य पक्षीय नेते मात्र त्यांच्याबरोबर अभावानेच दिसतात. तसेच भाजपची छुपी मदत मिळण्याची शक्यता नसल्याने सध्या तरी 'एकला चलो रे' अशीच त्यांची वाटचाल सुरू आहे.

प्रचाराच्या पहिल्या आठवड्यामध्ये दोन्ही उमेदवारांनी आधी ग्रामीण भाग पिंजून काढल्यानंतर शहरातील भागावर लक्ष केंद्रित केले आहे. एकत्रित शिवसेनेच्या हक्काच्या भागांमध्ये दोघांनीही प्रचाराचा धुरळा उडवून दिला. याशिवाय भाजपचे गड्डा मतदान समजल्या जाणाऱ्या भागांमध्येही दोघांचे प्रचार दौरे झालेले आहेत. शिरसाट महायुतीचे उमेदवार असल्याने भाजपचे मतदान आहे. पूर्वाश्रमीचे भाजपवासी असलेल्या शिंदे यांनाही त्या मतदारांकडून आशा आहेत. आता या मतदारसंघामध्ये प्रचार शिगेला पोहोचत असून शेवटच्या काही दिवसांमध्ये चित्र स्पष्ट होत जाईल असे दिसते. औरंगाबाद पश्चिम विधानसभा क्षेत्रामध्ये मुस्लिम आणि दलितांचे मताधिक्य सर्वाधिक आहे. येथे दलितांचे मताधिक्य सुमारे २४ टक्के आहे, तर आदिवासी समुदायाचे मताधिक्य एक टक्का इतका आहे. मुस्लिम समुदायाचा मतदानाचा हिस्सा सुमारे १७ टक्के आहे. याशिवाय, ग्रामीण आणि शहरी मतदारांची तुलना केली असता, या क्षेत्रातील २० टक्के ग्रामीण मतदार आहेत, तर ८० टक्के शहरी मतदार आहेत. तसेच, ही जागा विविध जाती आणि धर्माच्या लोकांचे मिश्रण असलेल्या मतदारसंघामध्ये स्थित आहे. ते स्थानिक राजकारणामध्ये मोठा प्रभाव टाकतात.

# नसीम खान पराभवाचे उट्टे काढणार?

मुंबईतील सर्वाधिक मतदार असलेला मतदारसंघ अशी ओळख असलेल्या चांदीवली विधानसभेमध्ये महायुतीचे दिलीप लांडे आणि महाविकास आघाडीचे नसीम खान यांच्यामध्ये थेट लढत होणार आहे. २०१९ मध्ये दिलीप लांडे यांचा अवघ्या ४०९ मतांनी विजयी झाला होता. आता या लांडे पुन्हा बाजी मारणार की खानपराभवाचे उट्टे काढणार का हे पाहायचे.


दिलीप लांडे नसीम खान

**लढाई रंगली**

गेल्या पाच वर्षांमध्ये पक्षफुटीमुळे पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. त्यामुळे होऊ घातलेल्या निवडणुकीमध्ये कोणाची सरशी होणार, नसीम खान मागील पराभवाचे उट्टे काढणार की लांडे पुन्हा विजयी पताका फडकवणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. चांदीवलीमध्ये सुमारे साडेचार लाख मतदार असून मराठी आणि मुस्लिम मतदारांचे प्राबल्य आहे. विद्यमान आमदार दिलीप लांडे आणि काँग्रेसच्या नसीम खान यांच्यासह ११ उमेदवार निवडणूक रिंगणामध्ये आहेत. दरम्यान, येथे मुस्लिम आणि मराठी मतांची सांगड घालणाऱ्या उमेदवारांच्या विजयाचा मार्ग सोपा होतो. २०१९ मध्ये नसीम खान यांच्याबाबत असलेली नाराजी, शिवसेनेच्या ताकदीच्या जोरावर लांडे यांना निसटता विजय मिळाला होता; यंदा मात्र सदरचे गणित जुळवताना त्यांची दमछाक होणार असल्याचे दिसत आहे. त्यामुळेच महायुती आणि महाविकास आघाडीच्या दोन्ही प्रमुख उमेदवारांनी सामाजिक आणि प्रादेशिक गणितांची जुळवाजुळव सुरू केली असली, तरी कोणाला निर्णायक आघाडी मिळणार, हे महत्त्वाचे आहे. २०१९ मध्ये शिवसेनेच्या माध्यमातून लांडे यांच्या पाठीशी एकगठ्ठा मते होती. शिवसेनेत उभी फूट पडली असून एक गट महायुतीमध्ये तर दुसरा गट महाविकास आघाडीसोबत आहे. त्यामुळे शिवसेनेची ताकद विभागली आहे. तसेच मनसेने महेंद्र भानुशाली हा मराठी चेहरा निवडणूक रिंगणात उतरवला आहे. त्यामुळे मराठी मतांची विभागणी अटळ आहे. दुसरीकडे निवडणूक रिंगणात नसीम खान यांच्यासह चार मुस्लिम उमेदवार आहेत. त्यामुळे मुस्लिम मतांची विभागणी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. ही विभागणी नसीम यांच्यासाठी डोकेदुखी ठरू शकते.

मागील निवडणुकीमध्ये महायुतीच्या माध्यमातून शिवसेनेच्या तिकिटावर दिलीप लांडे यांनी बाजी मारली होती; मात्र शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये झालेल्या फुटीमुळे चांदीवली मतदारसंघामध्ये गणिते बदलली आहेत. तसेच लोकसभा निवडणुकीमध्येही महाविकास आघाडीच्या उमेदवार वर्षा गायकवाड यांना पाच हजार मतांचे मताधिक्य मिळाले आहे. चांदीवली मतदारसंघामध्येच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवण्याचा प्रकार घडला होता. लांडे यांच्यासमोर जागा कायम ठेवण्याचे आव्हान आहे, तर अवघ्या ४०९ मतांनी आमदारकी हिरावली गेल्याने या निवडणुकीमध्ये नसीम खान गेल्या निवडणुकीच्या पराभवाचा वचपा काढण्यासाठी प्रयत्नशील आहेत. या मतदारसंघामध्ये एकेकाळी मनसेची चांगली ताकद होती; मात्र त्यांना मिळणारी मते सातत्याने कमी होत गेल्याचं चित्र आहे. २००९ मध्ये मनसेमधून उभे असलेल्या लांडे यांना ४८ हजार ९०१ मते मिळाली होती. २०१४ मध्ये मनसेकडून उभे राहिलेल्या ईश्वर तायडे यांना २८ हजार ६७८ मते मिळाली होती, तर २०१९ च्या निवडणुकीमध्ये मनसेच्या सुमित बारस्कर या उमेदवाराला सात हजार ९८ मते मिळाली होती. या निवडणुकीमध्ये मनसे किती मते मिळवणार? हे महत्त्वाचे ठरणार आहे.

अपक्ष म्हणून निवडून आलेले सांगलीचे विशाल पाटील खासदार नेमके कुणाचे, असा प्रश्न सध्या अवघ्या मतदारसंघाला पडला आहे. काँग्रेसकडून सातत्याने पाटील घराण्याची फसवणूक होत असल्याचा आरोप करत जिल्हा बँकेच्या उपाध्यक्ष आणि वसंतदादा पाटील यांच्या नात सून जयश्री पाटील यांच्या बंडखोरीला पाठबळ देण्याचे त्यांनी जाहीर केले. यातून महाविकास आघाडीतील काँग्रेसचे अधिकृत उमेदवार पृथ्वीराज पाटील यांची उमेदवारी अडचणीत आली आहे. दुसरीकडे सांगलीमध्ये एकास एक लढती करून भाजपने महाविकास आघाडीच्या दिग्गजांची कोंडी केली आहे.

# भाजपने घेरले महाविकास आघाडीला


जयश्री पाटील पृथ्वीराज पाटील


सहा महिन्यांपूर्वी महाविकास आघाडीच्या उमेदवाराविरूध्द काँग्रेसचे बंड म्हणत विशाल पाटील यांनी अपक्ष लोकसभा निवडणूक लढवली. या वेळी त्यांना जतमध्ये भाजपचे माजी आमदार विलासराव जगताप, कवठेमहांकाळचे माजी राज्यमंत्री अजितराव घोरपडे यांनी उघड साथ केली, तर पडद्याआड राहून माजी राज्यमंत्री विश्वजीत कदम यांनी आम्ही सांगलीचे वाघ आहोत, अशी डरकाळी फोडत कुमक पोहोच केली. भाजप अंतर्गत माजी खासदार संजयकाका पाटील यांच्यावर नाराज असलेल्यांची मदत तर झालीच; पण आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची तासगावमध्ये मदत झाली. याचा परिणाम म्हणजे भाजपची लोकसभेतील हॅट्रिक हुकली. आता विधानसभेची राजकीय मांडणी वेगळेच दर्शवत आहे. सांगलीमध्ये अपक्ष असलेल्या जयश्री पाटील यांना पाठिंबा देत असताना वसंतदादा घराण्यावर अन्याय झाल्याचे दिसले; मात्र मिरज मतदारसंघाने २५ हजाराचे मताधिक्य दिले, त्याठिकाणी तोळामासाही नसलेला शिवसेना उमेदवार दिल्याने महाविकास आघाडीने ही निवडणुक रामभरोसे सोडल्याचे स्पष्ट दिसत आहे. तरीही खासदार पाटील यांना या ठिकाणी मदत करणाऱ्यांवर अन्याय होत असल्याचे दिसत नाही. महापालिकेत एक नगरसेवक, ग्रामंपचायतीत एक सदस्य अथवा एकही सहकारी संस्था हाती नसताना मिरजेची निवडणूक आणि तीही विद्यमान पालकमंत्री सुरेश खाडे या सलग तीन वेळा निवडून आलेल्या उमेदवाराविरूध्द म्हणजे शिवसेनेचे धाडसच म्हणावे लागेल. या ठिकाणी खासदारांनी स्पष्ट भूमिका घेतली नाही; मात्र तासगावमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार रोहित पाटील यांच्या पाठीशी राहण्याचा विश्वास देत असताना काही दिवसापूर्वी 'नको अंजनी, नको चिंचणी' असे म्हणत असलेल्या घोरपडे यांना अनुकूल भूमिका घेतली होती. आता मात्र, केवळ आठ दिवसांमध्ये या भूमिकेत बदल केला. तिकडे खानापूरात शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार सुहास बाबर यांना अनुकूलता दर्शवली आहे, तर महाविकास आघाडीचे वैभव पाटील यांच्याशी त्यांचे सूत अद्याप जुळलेले नाहीत. यामुळे खासदार नेमके महाविकास आघाडीचे की कुणाचे असा प्रश्न पडला आहे.

सांगलीमध्ये दादा घराण्याची फसवणूक होत असल्याचे सांगत आम्ही काँग्रेसचाच विचार पुढे नेत असल्याचे त्यांनी सांगितले. आतापर्यंत झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये सर्वाधिक वेळा नेतृत्व दादा घराण्याकडेच होते. मग अन्याय झाला हे लोकांना पटणार आहे का, असाही प्रश्न होता. दादा घराण्यात स्व. विष्णुअण्णा पाटील, स्व. मदन पाटील यांच्या झालेला पराभवामागे कोणत्या शक्ती कार्यरत होत्या. स्व. मदन पाटील यांचा विधानसभा निवडणुकीमध्ये झालेला पराभव असो किंवा जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील पराभव; यामागे कोण होते याचे उत्तर सांगलीकरांना ज्ञात आहे. आता खासदारांना बंडखोरांच्या मागे ताकद दाखविल्याविना पर्याय उरलेला दिसत नाही. लोकसभा निवडणुकीमध्ये खासदारांना सांगली विधानसभा मतदारसंघामध्ये १९ हजार ९९२ मतांची आघाडी मिळाली होती. या मतांच्या हिशोबावर विधानसभेची गणिते मांडली जात आहेत. बंडखोरीच्या प्रचाराची सूत्रे माजी केंद्रिय राज्यमंत्री प्रतिक पाटील यांच्या हाती आहेत. त्यांना केंद्रामध्ये मंत्रिपद मिळाले होते. याचा जिल्ह्याला नेमका काय लाभ झाला हा प्रश्न वादातीत आहे. सांगलीत आता भाजप, काँग्रेस आणि बंडखोर काँग्रेस अशी तिरंगी लढत होत आहे. बंडखोराच्या तंबूत गर्दी वाढत आहे. माजी खासदार प्रतिक पाटील यांनी तर प्रचार सभेत कार्यकर्त्यांना दम देताना सांगितले, काम केले नाही तर महापालिका निवडणुकीच्या तिकिट वाटपात माझ्याशी गाठ आहे. यामुळे सांगलीत दादा घराणे एकसंघपणे सांगलीकरांना सामोरे जाते, त्या वेळी इतिहास घडतो. हाच इतिहास पुन्हा घडविण्यासाठी दादा घराणे सज्ज झाले आहे. जनता जनार्दन नेमका काय विचार करते आहे हे निकालानंतरच कळणार आहे.

जिल्ह्यातील आठ मतदारसंघांमधील जागा वाटपात महायुतीमध्ये भाजपला सर्वाधिक पाच, राष्ट्रवादीला दोन आणि शिंदेसेनेला खानापूरची एक जागा मिळाली, तर महाविकास आघाडीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला चार, काँग्रेसला तीन आणि उद्धवसेनेला मिरजची एक जागा मिळाली आहे. हा जिल्हा महाविकास आघाडीतील दिग्गज नेत्यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो; परंतु जिल्ह्यातील आठपैकी पाच जागा घेऊन भाजपाने काँग्रेसचे प्रदेश कार्याध्यक्ष डॉ. विश्वजीत कदम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि युवा नेते रोहित पाटील या स्टार प्रचारकांना बालेकिल्ल्यातच घेरण्याची रणनीती आखली आहे. जिल्ह्यातील आठपैकी सांगली, खानापूर आणि जत मतदारसंघांमध्ये बंडखोरी झाली आहे. त्यामध्ये सांगली मतदारसंघामध्ये काँग्रेसमध्ये, खानापूरला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षामध्ये आणि जतला भाजपमध्ये बंडखोरी झाली आहे; मात्र जयंत पाटील यांच्या इस्लामपूर मतदारसंघामध्ये भाजपचे जिल्हाध्यक्ष निशिकांत पाटील यांना ऐनवेळी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात प्रवेश देऊन महायुतीची उमेदवारी दिली. तासगाव-कवठेमहांकाळ मतदारसंघामध्ये महाविकास आघाडीचे रोहित पाटील यांच्याविरोधात भाजपचे माजी खासदार संजयकाका पाटील यांचा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात प्रवेश देत त्यांना उमेदवारी दिली. त्यामुळे या दोन्ही मतदारसंघांमध्ये राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी अशी एकास एक लढत होत आहे. तसेच पलूस-कडेगाव मतदारसंघातही डॉ. विश्वजीत कदम यांना बालेकिल्ल्यामध्ये घेरण्यासाठी भाजपचे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संग्राम देशमुख यांच्याशी एकास एक थेट लढत होत आहे. सांगली, जत, पलूस-कडेगाव या तीन मतदारसंघांमध्ये काँग्रेस आणि भाजपची थेट लढत आहे. तशीच लढत इस्लामपूर आणि तासगाव-कवठेमहांकाळ मतदारसंघामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) अशी आहे. जिल्ह्यातील आठपैकी मिरज मतदारसंघाचा अपवाद वगळता सात मतदारसंघांमध्ये तुल्यबळ लढती असल्याने निवडणूक चुरशीची होणार आहे. सांगली विधानसभा मतदारसंघामध्ये भाजपचे सुधीर गाडगीळ विरुद्ध काँग्रेसचे पृथ्वीराज पाटील विरुद्ध काँग्रेस नेत्या अपक्ष उमेदवार जयश्रीताई पाटील, मिरज विधानसभा मतदारसंघात भाजपचे सुरेश खाडे विरुद्ध ठाकरेंच्या शिवसेनेचे तानाजी सातपुते विरुद्ध वंचित बहुजन आघाडीचे विज्ञान माने, तासगाव कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघात अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे संजयकाका पाटील विरुद्ध शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे रोहित पाटील, खानापूर विधानसभा विधानसभा मतदारसंघात शिंदेंच्या शिवसेनेचे सुहास बाबर विरुद्ध शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे वैभव पाटील विरुद्ध अपक्ष उमेदवार राजेंद्र अण्णा देशमुख, पलूस कडेगाव विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे आमदार डॉ. विश्वजीत कदम विरुद्ध भाजपचे उमेदवार संग्रामसिंह देशमुख, शिराळा विधानसभा मतदारसंघात शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे मानसिंगराव नाईक विरुद्ध भाजपचे सत्यजीत देशमुख, इस्लामपूर विधानसभा शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे जयंत पाटील विरुद्ध अजित पवार यांच्या गटांकडून राष्ट्रवादीचे निशिकांत पाटील आणि जत विधानसभा काँग्रेसचे विक्रम सावंत विरुद्ध भाजपचे गोपीचंद पडळकर विरुद्ध भाजपमधून बंडखोरी केलेले अपक्ष तमनगौडा रवी पाटील यांच्यात लढत होत आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणाची दशा आणि दिशा मराठा समाजाने ठरवली आहे. २०२३ पासून महाराष्ट्राचे राजकारण मराठा समाजाच्या संताप, निराशा आणि आरक्षणाच्या मागणीभोवती फिरत आहे. मराठा आरक्षण आंदोलनाला बळ देऊन मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची झोप उडवून लोकसभा निवडणुकीमध्ये भाजप-शिवसेना-राष्ट्रवादीचा राजकीय खेळ उधळला होता. असे असतानाही विधानसभा निवडणुकीच्या काळामध्ये मराठा आरक्षणाचा आवाज ऐकू येत नाही.

# मराठा आरक्षणावर सर्वपक्षीय मौन!




**रण तापले**

निवडणुकीच्या प्रचारादरम्यान राजकारण्यांनी मराठा आरक्षण आंदोलनाचा बालेकिल्ला असलेल्या जालन्यामध्ये आरक्षणाच्या मुद्द्यापासून अंतर राखून केवळ महिला केंद्रीत कल्याणकारी योजनांवर लक्ष केंद्रित केले. भाजपप्रणित महायुती आघाडीचे नेते लाडकी बहिण योजनेचा उल्लेख करताना दिसत असतानाच महाविकास आघाडीचे नेतेही सत्तेत आल्यास महालक्ष्मी योजनेंतर्गत महिलांना दरमहा तीन हजार रुपये देण्याचे सांगत आहेत. अशा स्थितीमध्ये मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर दोन्ही आघाड्यांनी मौन बाळगण्याचे कारण काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. महाराष्ट्रातील मराठा समाज अनेक दिवसांपासून आरक्षणाची मागणी करत आहे; मात्र त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. आरक्षण न मिळाल्याने शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये मागे पडत असल्याची मराठा समाजातील तरुणांची भावना आहे. यामुळे मराठा समाजातील २१ वर्षीय दीपा भोसले हिने आत्महत्या केली आहे. यानंतर आरक्षणाच्या मुद्द्याने एवढा वेग घेतला, की संपूर्ण महाराष्ट्राला आपल्या राजकीय प्रभावाखाली घेतले. ही मागणी घेऊन मनोज जरांगे यांनी वारंवार उपोषणे केली. मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र हे क्षेत्र मराठा आरक्षणाचे केंद्र बनले. मराठा आंदोलनामुळे शिंदे सरकारने मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देणारे विधेयक मंजूर केले होते. मराठा समाजाला ओबीसीतूनच आरक्षणाच्या मागणीसाठी जरांगे यांनी जालन्यात उपोषण केले. त्यामुळे मराठा समाजाला कुणबी जातीअंतर्गत आरक्षण देण्याचा मार्ग शिंदे सरकारने शोधून काढला; मात्र ओबीसी समाजाच्या नाराजीमुळे तो अडचणीत अडकला.

मराठा आरक्षणामुळे ओबीसी कोट्यावर कोणताही परिणाम होणार नाही, अशी ग्वाही शिंदे देत राहिले; मात्र मराठा विरुद्ध ओबीसी आणि धनगर विरुद्ध आदिवासी या कथनामुळे आरक्षणाची मागणी पूर्ण होऊ शकली नाही. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्राचा मराठा पट्टा मानल्या जाणाऱ्या मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात भाजपचा पूर्ण सफाया झाला. मराठवाड्यातील लोकसभेच्या आठ जागांपैकी भाजपला एकही जागा जिंकता आली नाही आणि पश्चिम महाराष्ट्रात भाजपचे खातेही उघडले नाही. मराठा आरक्षण आंदोलनामुळे भाजपला तोटा सहन करावा लागला, तर काँग्रेस-शिवसेना (ठाकरे) आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला राजकीय फायदा झाला. असे असतानाही विधानसभा निवडणुकीच्या प्रचारामध्ये मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर महायुती किंवा महाविकास आघाडी काहीही बोलत नाही. महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही आघाड्यांच्या दिग्गज नेत्यांनी निवडणूक प्रचारात पूर्ण ताकद लावली असली, तरी मराठा आरक्षणावर ते काहीच बोलत नसल्याचे दिसून आले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आत्तापर्यंत जालना येथे दोन निवडणूक सभांना संबोधित केले. ज्यात त्यांनी महाविकास आघाडी आणि उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली आहे; परंतु मराठा किंवा ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर भाष्य करण्याचे टाळले आहे. मुख्यमंत्र्यांनी लाडकी बहिण योजनेचा उल्लेख केला. जालना लोकसभा मतदारसंघातून पराभवाला सामोरे जावे लागलेले माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांचे चिरंजीव संतोष दानवे यांचा प्रचार करताना आरक्षणाचा मुद्दा टाळताना दिसले. राहुल गांधींनीही मराठा आरक्षणावर मौन बाळगले. काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी जालन्यातील सभेत आरक्षणाच्या मुद्द्यावर बोलणे टाळले. सभेमध्ये पटोले यांनी महायुती सरकार आणि त्यांच्या कल्याणकारी योजनांवर निशाणा साधला. राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार यांनी जालना येथे जाहीर सभेला संबोधित करताना जात जनगणना आणि आरक्षणाची मर्यादा वाढवण्याची मागणीही केली; मात्र मराठा आरक्षणाच्या मुद्द्याचा उल्लेख करण्याचे टाळले. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी प्रचारादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली होती; मात्र त्यांनीही आरक्षणाच्या मुद्द्यावर कोणतेही भाष्य केले नाही. मराठा आरक्षण आंदोलनामुळे ओबीसी समाज सर्वाधिक असुरक्षित वाटत आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये ओबीसी मते विखुरली जाण्याचा धोका दिसू लागल्याने राजकीय पक्ष मराठा आरक्षणाचा मुद्दा उपस्थित करत नसल्याचे दिसून येते.

**मुद्दे आणि गुद्दे**

# मी निवडणूक का लढवत नाही ?



सध्या निवडणुकीचे वारे वाहत आहेत. रोज नेत्यांच्या मुलाखती आणि प्रचारसभा चालू आहेत. राज ठाकरे मोठे नेते असूनही स्वत: निवडणुकीला कधीच उभे राहत नाहीत. याबाबत त्यांनी एक जुना किस्सा सांगितला. राज ठाकरे म्हणाले, '१९७४ ची गोष्ट आहे. आमचे माने नावाचे वाहनचालक आले नव्हते, त्यावेळी शिवसना भवन नव्हते. वांद्र्यात ब्लू पर्लची इमारत होती, तेथील पहिल्या मजल्यावर एक छोटीशी खोली होती. तेच शिवसेनेचे ऑफिस होते. मी आणि बाळासाहेब कार्यालयात जायला निघालो. तेवढ्यात तत्कालीन महापौर सुधीर जोशी आले. त्यांची इम्पाला ही मोठी लाल दिव्याची गाडी होती. त्यांना बाळासाहेबांशी बोलायचे होते. त्यांचे बोलून झाल्यावर बाळासाहेब बाहेर आले. तेवढ्यात सुधीरभाऊंनी विचारले, 'कुठे जाताय? मी सोडतो.' तर बाळासाहेब म्हणाले, 'तुमचे दिवे तुमच्यापाशी राहु देत. मी नाही तुमच्या दिव्याच्या गाडीत बसणार.' मी हे सगळं ऐकत होतो आणि मग आम्ही टॅक्सीमध्ये बसलो. टॅक्सी सुरू झाली आणि वांद्रांच्या ब्रिजवर असताना मी मागे वळून पाहिले तर टॅक्सीच्या मागे लाल दिव्याची गाडी होती. तो लाल दिवा ज्याच्यामुळे होता, ती व्यक्ती माझ्या शेजारी बसली होती. आता मला सांगा, हे चित्र ज्या मुलाने पाहिले असेल, त्याला खुर्चीचा सोस असेल का? बाळासाहेब ठाकरे किंवा माझ्या वडिलांनी कोणती गोष्ट करा अथवा करू नका, असं मला सांगितले नाही. त्यामुळे मीही माझ्या मुलाला काही सांगत नाही. त्याला निवडणूक लढवावी वाटली, तो लढवतोय. पण निवडणुकीमध्ये उतरावे असे मला कधीच वाटत नाही. कारण, मी ज्या मुशीतून वर आलोय, त्यामुळे मला असे काही वाटत नाही,' असे राज ठाकरे म्हणाले.

# प्रचार सभा, दौरे आणि नेत्यांची झडती



महाराष्ट्रात मतदानाच्या तीन दिवस आधी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (एससीपी) अध्यक्ष शरद पवार यांचे हेलिकॉप्टर आणि बॅग तपासण्यात आली आहे. शरद पवार बारामतीहून सोलापूरला प्रचारासाठी जात होते. दरम्यान, निवडणूक आयोगाचे अधिकारी हेलिपॅडवर पोहोचले. त्याचा व्हिडिओही जारी करण्यात आला आहे. व्हिडिओमध्ये अधिकारी हेलिकॉप्टरमधून शरद पवार यांची बॅग बाहेर काढताना आणि त्यात ठेवलेल्या वस्तू तपासताना दिसत आहेत. तपासणीदरम्यान शरद पवार हे हेलिकॉप्टरच्या बाहेर उभे असल्याचे दिसले. तपासणी करून ते सोलापुरातील सभेला रवाना झाले.

निवडणूक आयोगाने गेल्या काही दिवसांत 11 बड्या नेत्यांच्या बॅगा तपासल्या आहेत. शरद पवार यांच्या चेकिंगच्या एक दिवस आधी अमरावतीत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची बॅगही तपासण्यात आली. त्याच्या एक दिवस आधी म्हणजे शुक्रवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हिंगोलीतील रॅलीपूर्वी बॅग तपासण्यात आल्या.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने देशातील 11 बड्या नेत्यांची चौकशी केली आहे. 14 नोव्हेंबर रोजी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, महाराष्ट्र काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले आणि उद्धव ठाकरे यांच्या हेलिकॉप्टरची तपासणी करण्यात आली. निवडणूक प्रचारासाठी खरगे नाशिकला पोहोचले होते. त्यांच्या तपासाची हेलिपॅडवर व्हिडिओग्राफीही करण्यात आली.

गोंदियात महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांचे हेलिकॉप्टर आणि बॅग तपासण्यात आली. ते गोरेगाव विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादीच्या (एसपी) उमेदवाराच्या प्रचारासाठी जात होते. अहमदनगरमध्ये तिसऱ्यांदा उद्धव ठाकरेंची चौकशी झाली. अशा प्रकारे कराड विमानतळावर (सातारा) गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या सामानाचीही तपासणी करण्यात आली.

13 नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीही तपासणी करण्यात आली. ते पालघरमध्ये प्रचारासाठी आले होते. यादरम्यान त्यांनी अधिकाऱ्याला सांगितले होते- कपडे आहेत, लघवीचे भांडे वगैरे नाही. ही टिप्पणी म्हणजे उद्धव यांच्या वक्तव्यावर टोला होता. याशिवाय केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या हेलिकॉप्टरचीही तपासणी करण्यात आली.

वास्तविक, 11 आणि 12 नोव्हेंबरला उद्धव ठाकरेंच्या सामानाची दोनदा तपासणी करण्यात आली. उद्धव यांनी त्याचा व्हिडिओ शेअर केला होता, ज्यामध्ये ते म्हणत होते, माझी बॅग तपासा. लघवीचे भांडे पण तपासा, पण आता मला तुमचा मोदींची बॅग तपासतानाचा व्हिडिओ हवा आहे. तेथे शेपूट वाकवू नका. त्यानंतर मंगळवारी लातूरमध्ये नितीन गडकरी यांची बॅग निवडणूक आयोगाने तपासली.

महाराष्ट्र भाजपने बुधवारी वर एक व्हिडिओ पोस्ट केला होता ज्यामध्ये सुरक्षा कर्मचारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सामान तपासताना दिसत आहेत. हा व्हिडिओ 5 नोव्हेंबरला कोल्हापूर विमानतळाचा असल्याचे पक्षाने सांगितले होते. यापूर्वी 7 नोव्हेंबरला यवतमाळ जिल्ह्यातही त्यांच्या सामानाची तपासणी करण्यात आल्याचा दावा पक्षाने केला होता.

उद्धव ठाकरेंच्या चेकिंगचा व्हिडिओ समोर आल्यानंतर 12 नोव्हेंबरला फडणवीस म्हणाले होते की, माझी बॅग कोल्हापुरातही तपासण्यात आली, त्यानंतर 7 नोव्हेंबरलाही चेकिंग झाली. तपासाला विरोध करून उद्धव लोकांचे लक्ष दुसरीकडे वळवत आहेत. त्यांना रडून, ओरडून मते मिळवायची आहेत. बॅग तपासण्यात गैर काय? निवडणूक प्रचारादरम्यान आमच्या बॅगाही तपासल्या जातात.

राष्ट्रवादीचे नेते अजित पवार 5 नोव्हेंबरला म्हणाले होते, 'आज निवडणूक प्रचारादरम्यान माझी बॅग तपासण्यात आली. निवडणूक आयोगाचे अधिकारी माझ्या हेलिकॉप्टरमध्ये नियमित तपासणीसाठी आले होते. मी पूर्ण सहकार्य केले. निष्पक्ष निवडणुकांसाठी अशी प्रक्रिया आवश्यक आहे, असे माझे मत आहे. आपली लोकशाही टिकून राहण्यासाठी आपण कायद्याचा आदर केला पाहिजे.

2019 मध्ये भाजप-शिवसेना युती होती. भाजपने 105 तर शिवसेनेने 56 जागा जिंकल्या. आघाडीकडून राष्ट्रवादीला 54 तर काँग्रेसला 44 जागा मिळाल्या. भाजप-शिवसेनेची सत्ता सहज आली असती, पण मतभेदामुळे युती तुटली. 23 नोव्हेंबर 2019 रोजी फडणवीस यांनी मुख्यमंत्री आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. मात्र, या दोघांनीही बहुमत चाचणीपूर्वी 26 नोव्हेंबर रोजी राजीनामा दिला.

28 नोव्हेंबर रोजी शिवसेना (अविभक्त), राष्ट्रवादी (अविभक्त) आणि काँग्रेसची महाविकास आघाडी सत्तेवर आली.यानंतर शिवसेना (अविभक्त) आणि राष्ट्रवादी (अविभक्त) यांच्यात फूट पडली आणि हे दोन्ही पक्ष चार गटात विभागले गेले. तरीही लोकसभा निवडणुकीत शरद पवार आणि उद्धव ठाकरेंना फायदा झाला. आता या पार्श्वभूमीवर विधानसभा निवडणुकाही होत आहेत.

यावेळी, राज्यात महायुती विरूद्ध महाविकास आघाडी अशी लढत होत असून, अनेक ठिकाणी राष्ट्रवादी विरूद्ध राष्ट्रवादी तर कित्येक ठिकाणी शिवसेना विरूद्ध शिवसेना अशा लढती आहेत. गेल्या आठवड्यात बॅग तपासल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी बराच थयथयाट केला होता. त्यांनतर अनेक नेत्यांनी बॅग तपासणी ही साधारण प्रक्रिया असून, त्याचा एवढा बाऊ करण्याचे कारण नसल्याचे म्हटले होते. यावर्षीच्या विधानसभा निवडणुकीत हा बॅगा तपासण्याचा मुद्दा जरा अधिकच हिट ठरला. तथापि, नेत्यांच्या बॅगा तपासणे, ही केवळ नौटंकी असून, या प्रकाराच्या मागे दुसरेच काहीतरी दडले असावे, असा अनेक मतदारांचा कयास आहे.

●●●●●●●●●

# हमीभावात वाढ शेतकऱ्यांमध्ये समाधान



विदर्भ मराठवाड्यातील आणि काहीशा पश्चिम महाराष्ट्र- उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना नगदी पीक म्हणून पसंतीला उतरलेल्या सोयाबीनच्या उत्पादनात भरीव वाढ करण्याचे तंत्रज्ञान, खाद्य तेलामध्ये स्वयंपूर्ण होण्याच्या उद्देशाने प्रक्रिया उद्योगाला चालना आणि मूल्यवर्धन अशी मूल्य साखळी तयार करून राज्यातील लाखो सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भरीव वाढ करण्याचे उद्दिष्ट महायुती शासनाने आपल्या जाहीरनाम्यात ठेवलेले आहे.

महायुती सरकारने यंदा सोयाबीन उत्पादकाला साधारण सहा हजार रुपये प्रति क्विंटल पर्यंत हमीभाव देण्याची केलेली घोषणा तसेच केंद्र शासनाने राज्याच्या हमीवर 12% ओलाव्याची मयार्दा 15 % टक्के पर्यंत वाढवल्यामुळे यंदा राज्यातील लाखो सोयाबीन उत्पादकांना दिलासा मिळालेला आहे. त्यामुळे या निर्णयाचे शेतकऱ्यांनी स्वागत केले आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये उदयास आलेल्या विदेशातील सोयाबीन पिकाकडे कोरडवाहू शेतकऱ्यांचा कल वाढलेला आहे. जगाच्या तुलनेत केवळ 3 टक्के सोयाबीनचे उत्पादन भारतात होत असल्यामुळे सोयाबीनच्या दरावर भारत सरकार नियंत्रण ठेवू शकत नाही.

जागतिक पातळीवर सोयाबीनचे सर्वाधिक उत्पादन ब्राझील, अमेरिका, अर्जेंटिना, चीन त्या खालोखाल आपल्या भारत देशात होते. जागतिक स्तरावरील सोयाबीनचे दर हे भारत सरकार देत असलेल्या किमान आधारभूत टरढ दराच्या साधारण निम्म्याहून कमी असतात. यंदा भारतात यंदा सोयाबीनचे उत्पादन 131 लाख टन झालेले आहे.

राज्यातील महायुती सरकारने सोयाबीन उत्पादकांना दिलासा देण्यासाठी या शेतकऱ्यांना 5 हजार रुपये मदतही जाहीर केलेली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बाजारात हमीभावापेक्षा कमी दर असला तरी शेतकऱ्यांना त्याचा फटका बसणार नाही यासाठी बाजारातील दर आणि हमीभाव यातील फरकाची रक्कम सरकारकडून थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर टाकली जाणारी 'भावंतर योजना' जाहीर केली होती. त्यानुसार सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी किमान आधारभूत दर टरढ आणि बाजारात शेतकऱ्याचे सोयाबीन विक्री झालेल्या दरातील फरक हा या भावांतर योजनेच्या माध्यमातून सोयाबीन उत्पादक शेतकऱ्याला मिळणार आहे.

मात्र गेल्या महिनाभरात हवामानातील बदल, अवेळी पडलेला परतीचा पाऊस त्यामुळे आद्रता कमी न झाल्यामुळे शेतकऱ्यांना एफएक्यु क्वालिटीचा सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्रावर देता आला नाही. त्यावर उपाय म्हणून सरकारने ओलाव्याची मर्यादा 12% वरून 15 टक्के पर्यंत नेत 3 टक्क्याने शिथिल केली आहे. यामुळे शेतकऱ्यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. सोयाबीनचे दर हे सोया पेंडच्या मागणीवर अवलंबून असतात. भारतात गेल्या वर्षभरात शासनाने इथेनॉल निर्मितीला प्रोत्साहन दिल्यामुळे मका पेंड स्वस्त दरात उपलब्ध झाली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात सोयाबीन पेंड शिल्लक राहिली आहे.

त्यामुळे प्रक्रिया उद्योजक ही हवालदिल आहेत. ही पेंड निर्यात होईपर्यंत तयार झालेल्या सोयाबीन पेंडच्या निर्यातीला प्रोत्साहन अनुदान देईपर्यंत सोयाबीनचे दर वाढणार नाहीत म्हणून सोया पेंड निर्यातीला सरकारने प्रोत्साहन अनुदान द्यावे मागणी भारतीय जनता पार्टी किसान मोर्चाच्या वतीने राज्य सरकारकडे करण्यात आली आहे.

जागतिक स्तरावर सोयाबीन पेंड मोठ्या प्रमाणात शिल्लक असून मागणी घटल्यामुळे सोया पेंड ला उठाव नाही पर्यायाने हे दर वाढलेले नाहीत.

केंद्र शासनाने यंदा 4892 रु प्रति क्विंटल हा एमएसपी जाहीर केलेला आहे. तरी ही शेतकऱ्यांना साधारण 4200 रुपये प्रतिक्विंटलच्या आसपास सोयाबीन विकावा लागला.

दिवसेंदिवस सोयाबीन उत्पादनाचे क्षेत्र वाढत आहे. पुढील वर्षी देखील त्यात भरच पडणार आहे. त्यामुळे महायुती शासनाने सोयाबीन उत्पादक शेतक?यांना नियमित चांगला भाव मिळावा यासाठी सोयाबीन वर प्रक्रिया उद्योग सुरू करण्याची घोषणा आपल्या जाहीरनाम्यात केलेली आहे.

सोयाबीन पासून केवळ 18 टक्के खाद्य तेल तयार होते. उर्वरित सर्व सोयाबीन हे प्रक्रिया उद्योग आणि पशु आहारासाठी वापरले जाते. केंद्र आणि राज्य सरकारच्या या निर्णयामुळे सोयाबीनचे दर वाढणार असल्यामुळे शेतकऱ्यांना तर सोयाबीन पिकाचे मूल्यवर्धन आणि प्रक्रिया उद्योगामुळे सोयाबीन तेलाचे दर स्थिर राहणार असल्यामुळे ग्राहकांना आणि त्यातून सोयापेंड विक्रीसाठी उपलब्ध होणार असल्याने व्यापारी वर्गाला दिलासा मिळणार आहे.

●●●●

# परस्परांशी आदराने जगण्याचा मार्ग

## सहनशीलता

जगात जेवढे म्हणून तंटे-बखेडे होतात, त्यांचे मूळ कारण म्हणजे कोणत्या ना कोणत्या दिव्य गुणाचा अभाव हेच आहे.

माणसामाणसांमध्ये जी भिन्नता आढळून येते, तीसुद्धा कोणत्या ना कोणत्या दिव्य गुणाच्या उणिवेमुळेच होय. तेव्हा दुर्गुण सोडून दिव्य गुण धारण करण्यासाठी प्रोत्साहन देणे, हेच जगातील सर्व तत्त्वज्ञानाचे व धर्मग्रंथाचेही उद्दिष्ट आहे.

---------------------

संतश्रेष्ठ सत्यसम्राट हरदेवसिंहजी महाराज सत्य स्वीकारण्यास सांगताना म्हणतात,

मक्खन ईश्वर रचनहार है छाछ तो इसकी माया है!
प्रभु सदा है कायम दायम माया तो एक छाया है!
निश्चय ही तू गाफिल बन्दे आखिर में पछताएगा!
सन्तजनों का जो मारग है वो मारग अपनाले तू!
कहे 'हरदेव' छोड़ नकल को बन्दे असल उठा ले तू!

नागरिकांची बांधिलकी या चळवळीसाठी ते आवश्यक आहेत. आजचा विश्व सहनशीलता हा दिवस याच संदेशासाठी प्रायोजित केला आहे. मतभिन्नता किंवा दुसऱ्याची मते लादून घेणे म्हणजे सहनशीलता नव्हे, तर परस्परावरील आदराने आणि एकमेकांशी समेट करून जगण्याचा तो एक मार्ग आहे. जागतिक पातळीवरील विविधतेला न घाबरता तिचा अंगीकार करणे, हाच तर सहनशीलतेचा पाया ठरतो. माणसातील अंतर्मुखता, गांभीर्य, धैर्य, शीतलता, नम्रता, संतुष्टता, सरलता हे सर्वही दिव्य गुण आहेत. या सर्वही गुणांमध्ये आणखी एक महान गुण आहे सहनशीलता. कोणतेही श्रेष्ठ उद्दिष्ट गाठायचे म्हणजे सारे काही सहन करावे लागते.

खोद खाद धरती सहे, कॉंट कूँट बनराये
कटु वचन साधु सहे, औरौं को सहा न जाए

१६ नोव्हेंबर १९९५ पासून हा दिवस साजरा करण्यात येतो. मानवी मूलभूत हक्कांची जोपासना करीत असताना, मानवतेची अस्मिता जपताना, मानवी मूल्यांची कदर करीत आपल्या पुढच्या पिढीला युद्धाच्या अरिष्टापासून वाचविण्यासाठी असहनशीलतेचा अंत व्हावा, या उद्देशाने युनेस्कोने या दिवसाची घोषणा केली होती.

मानवी बुद्धिमत्ता आणि एकजूट यांचा वापर करून पृथ्वीवर सर्वत्र व सतत शांती पसरावी, यासाठी राष्ट्रकुल सतत प्रयत्नशील असते. आजचे जग दहशतवाद, जातीयवाद, हिंसा, प्रांतीयवाद, तीव्र राष्ट्रीयता, मूलतत्त्ववाद आदींमुळे अस्वस्थ आहे. म्हणून राष्ट्रकुल आपल्या सदस्य राष्ट्रांना आवाहन करते, की जात, धर्म, भाषा, लिंग, राष्ट्र असे भेदभाव बाजूला सारून सकलांनी मानवतेच्या उद्धारार्थ सहनशीलतेची कास धरली पाहिजे. सहनशीलता हाही एक सद्गुण आहे व त्यामुळे सर्वत्र शांती नांदते. इतकेच नव्हे तर आर्थिक आणि सामाजिक प्रगतीस हातभार लागतो.

त्यासाठी राज्यपातळीवरील कायद्याने सर्व नागरिकांना समान हक्क दिले पाहिजेत. समाजातील विविध गटात मतभेद होऊ शकतात. पण ते मिटविण्यासाठी समर्थ यंत्रणा देखील कार्यरत असायला हवी. सहनशीलतेचा प्रसार होण्यासाठी शिक्षण हे प्रभावी माध्यम आहे. जागतिक पातळीवरील विविधतेला न घाबरता तिचा अंगीकार करणे हाच तर सहनशीलतेचा पाया ठरतो.

सन २००५च्या विश्व परिषदेत या घोषणेचा पुनरुच्चार होऊन राष्ट्रीय नेत्यांनी आणि त्यांच्या सरकारांनी सहनशीलतेला उत्तेजन देऊन वेगवेगळ्या समाजगटात, संस्कृती विभागात तसेच लोकांमध्ये संवाद घडवून आणला पाहिजे.

त्यांच्यात परस्पर सहकार्याची भावना रूजवून प्रगतीच्या दिशेने नेण्यास प्रयत्न असावेत.

हा दिवस साजरा करण्यासाठी दहा मुद्यांवर भर दिला जातो.

१) समाजातील विविधतेचा अभ्यास करा. अनेक वाद्ये एकत्रित येऊन वाद्यवृंद कर्णमधूर संगीत निर्माण करतो, हे उदाहरण लक्षात ठेवा.

२) समाजातील विविध घटकांना, मग ते धामिर्क असोत, जातीय असोत, भाषेचे असोत, त्यांच्या मानवी हक्कांची जोपासना करा.३) स्वतःची अशी सहनशीलता प्रकल्पाची योजना आखा. स्वतःची दुसऱ्यांच्या जागी कल्पना करून बघा.

४) घरीदारी, शाळा-कॉलेजमध्ये, कामाच्या ठिकाणी, सार्वजनिक स्थळी हिंसेला थारा देऊ नका.

५) हवामान आणि पर्यावरण सगळ्यांशी सारख्याच प्रमाणात निगडीत असते. तेव्हा पर्यावरणाचा एखादा प्रकल्प राबवून सर्वांना एकत्र आणा.

६) सणावारी सर्वधर्मसमभाव प्रेरित करण्याचे मेळावे आयोजित करा. निरनिराळ्या धमार्तील तत्त्वांचा अभ्यास करा.

७) एखादी ताजी घटना घडली असेल तर तिचा उहापोह करण्यासाठी तज्ज्ञांची चर्चासत्रे भरवा. त्या घटनेचे मूळ कारण सकलांना कळू द्या.

८) खेळक्रीडांचे सामने सहनशिलता अंगी मुरविण्यास बऱ्यापैकी हातभार लावतात. समाजात खिलाडू वृत्ती रुजविण्याचा प्रयत्न करा.

९) आपली क्रयशिलता वापरून नवनिमिर्ती करा. कथा, नाटक, कविता, गाणी, लेख, चित्र, छायाचित्र याद्वारे सहनशिलतेचे गुणगान गा.

१०) आपल्या कार्याद्वारे जागतिक पातळीवर सहनशिलतेचा संदेश पोहचविण्याचा प्रयत्न करा. त्यासाठी युनेस्कोच्या असोशिएट प्रोजेक्टमध्ये सहभागी व्हा. जगद्गुरू संतशिरोमणी तुकारामजी महाराज सहनशील होण्यास बजावतात-

कोणी निंदा कोणी वंदो आम्हां स्वहिताचा धंदो
काय तुम्हांसी गरजे आम्ही भजू पंढरीराजे
तुम्हांसारिखे चालावे तेव्हां स्वहिता मुकावे
तुका म्हणे हो कां कांही गळा दिला विठ्ठल-पायी

एकदा एक गुराखी चरण्यासाठी जंगलात घेऊन गेला होता. गुरांना चरण्यासाठी सोडून दिल्यावर एकटाच एका झाडाखाली बसला. वेळ घालवण्यासाठी म्हणून जवळच पडलेल्या एका दगडाने दुसऱ्या दगडावर आघात करू लागला. दोन-तीन आघात झाल्याबरोबर तो दगड तुटला व थोड्या अंतरावर जाऊन पडला. गुराख्याने दुसरा दगड घेतला व आता या दगडावरही तो तसेच आघात करू लागला.

या दगडाने मात्र ते सर्व घाव सहन केले आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे संध्याकाळपर्यंत त्या दगडाचे एका सुंदर मूर्तीत रूपांतर झाले. त्या गुराख्याने ती मूर्ती तेथेच ठेवली व गुरांना घेऊन निघून गेला. रस्त्यावरून जाणाऱ्या शेतमजुरांना जेव्हा ती मूर्ती दिसली तेव्हा त्यांना वाटले, की हा तर चमत्कारच झाला. सकाळी तर येथे मूर्ती नव्हती. प्रभूने आपल्यासाठीच ही मूर्ती पाठवली असेल. अवश्य आपणास या मूतीर्साठी मंदिर बनवावे लागेल, असे म्हणून ग्रामस्थांनी सगळ्यांच्या सहयोगाने तेथे मंदिर बनवून त्यात या मूर्तीची स्थापना केली.

या मूर्तीवर वाहण्यासाठी नारळ फोडायला दगड हवा होता म्हणून एक ग्रामस्थ खाली पडलेला एक दगड उचलतो तर तो तोच दगड असतो जो त्या गुराख्यांच्या फक्त दोन-तीन प्रहारांनी तुटलेला असतो. त्याला मंदिराच्या दरवाजाजवळ ठेवले जाते.



कृष्णकुमार आनंदी
गोविंदा निकोडे
गडचिरोली.
९४२३७१४८८३

---------------

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

●●●●●●●

# आमदाराला दर महिन्याला किती पगार?



महाराष्ट्रात सध्या विधानसभा निवडणुकांचा रणसंग्राम सुरु झाला आहे. येत्या २० नोव्हेंबर रोजी राज्यात एकाच टप्प्यात निवडणुका पार पडत आहे. तर २३ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर होतील व राज्याला लवकरच नवनिर्वाचित आमदार मिळणार आहेत.

आमदार हे आपपल्या विधानसभा मतदारसंघाची सतत काम करत असतात. त्यासाठी त्यांना एक विशिष्ट निधी दिला जातो. पण आपल्यापैकी अनेकांना हा प्रश्न पडतो की आमदाराचा पगार किती असेल, त्याला किती पेन्शन किंवा भत्ता मिळत असेल. त्यासोबतच त्याला काय सोयी-सुविधा मिळत असतील?

महाराष्ट्र विधिमंडळाच्या विधानसभा आणि विधानपरिषद अशा दोन्ही सभागृहातील सर्व सदस्यांना नियमानुसार विशिष्ट रक्कम पगार म्हणून दिली जाते. त्यासोबतच काही भत्ते आणि सुविधाही दिल्या जातात. प्रत्येक आमदाराला नियमानुसार पगार, भत्ता, सवलती या मिळतात. विधिमंडळाच्या सदस्यांना दर महिन्याला साधारण 1 लाख 82 हजार 200 रुपये पगार मिळतो.

**कोणकोणते भत्ते मिळतात?**

त्यासोबतच त्यांना इतर काही भत्ते आणि सुविधाही दिल्या जातात. आमदारांना टेलिफोनसाठी 8 हजार रुपये भत्ता, स्टेशनरीसाठी 10 हजार रुपये भत्ता, तसेच संगणकासाठी 10 हजार रुपये भत्ता दिला जातो. यांसह अनेक भत्ते पकडून प्रत्येकी एका आमदाराला महिन्याला साधारण 2 लाख 41 हजार 174 रुपये पगार मिळतो.

याशिवाय अधिवेशनादरम्यान प्रत्येक आमदाराला दर दिवशी काही विशिष्ट रक्कम भत्ता स्वरुपात दिली जाते. ती रक्कम दरदिवशी 2 हजार रुपये असते. तसेच आमदारांच्या पीएच्या पगारासाठी 25 हजार रुपये मंजूर करण्यात येतात.

त्यासोबतच आमदाराला राज्यांतर्गत प्रवासासाठी दर वषार्ला 15 हजार रुपये मिळतात. तर महाराष्ट्राबाहेर जाण्यासाठी स्वतंत्र 15 हजार रुपये मिळतात. तर आमदार विमानतळाहून राज्यांतर्गत 32 वेळा आणि देशांतर्गत 8 वेळा प्रवास करू शकतात. यांसह BEST, MSRTC आणि MTDC मध्ये मोफत प्रवासाची सुविधा दिली जाते.

**माजी आमदाराला पेन्शन किती?**

राज्यात प्रत्येक माजी आमदाराला निवृत्ती वेतन मिळते. आमदाराचे निधन झाले असल्यास त्यांच्या कुटुंबालाही निवृत्ती वेतन मिळते. दोन्ही पैकी कोणत्याही एका सभागृहात शपथ घेतलेल्या माजी आमदाराला निवृत्ती वेतन मंजूर होते. माजी आमदाराला प्रति महिना 50 हजार रुपये निवृत्ती वेतन दिले जाते.

जर एखादा आमदार एकाहून अधिक टर्म आमदार झाला असेल तर त्याच्या निवृत्ती वेतनात 50000+2000 असे प्रत्येक टर्मसाठी वाढत जातात. विशेष बाब म्हणजे महाराष्ट्रात प्रत्येक माजी आमदाराला पेन्शन मिळते. जर एखादा व्यक्ती एकदा आमदार झाला तरीही त्याला निवृत्ती वेतन सुरू होते.

यापूर्वी आमदारांचं निवृत्ती वेतन 40 हजार रुपये होतं. 2016 मध्ये या निवृत्तीवेतनात 10 हजारांनी वाढ करण्यात आली. आमदाराच्या निधनानंतर- पती किंवा पत्नीला 40 हजार रुपये निवृत्तीवेतन मिळते. तसंच रेल्वे प्रवासाचीही सुविधा मिळते.

●●●●●●●

## चला, करू मतदान

मत अनमोल । ठेवूनिया जाण ।।
ठेवा जरा भान । क्षणोक्षणी ।।१।।

ध्यानात ठेऊ या । बुधवार दिन ।।
करू या सन्मान । लोकशाही ।।२।।

वीस नोव्हेंबर । फक्त मतदान ।।
नको मान पान । कशाचाही ।।३।।

ऐकावे जणाचे । करावे मनाचे ।।
न व्हावे कुणाचे । गुलामची ।।४।।

वृद्ध असो युवा । या मत देऊन ।।
राहील टिकून । लोकशाही ।।५।।

टाळू नका कोणी । मतदान करा ।।
लोकशाही करा । बळकट ।।६।।

मतदानासाठी । करू या जागृती ।।
जनता जाणती । असावीच ।।७।।

जागृत असावे । देताना हे मत ॥
विकासाची वात । पेटणार ॥ ८ ॥

अभंगकार
प्रा. अरुण बाबाराव बुंदेले,
रुक्मिणीनगर, अमरावती.
८०८७७४८६०९

# घशातील खवखव आणि आजार?

घसा खवखवल्यास त्याकडे केव्हाही दुर्लक्ष करणे धोक्याचे ठरू शकते. अशा परिस्थितीत तुम्ही त्वरित डॉक्टरांना भेटले पाहिजे.



घसा खवखवत असेल तर गंभीर आजारांना समोरं जावं लागू शकतं. घसा खवखवल्यास त्वरित डॉक्टरांना भेटले पाहिजे.

**बॅक्टेरियल इन्फेक्शन**

घसा खवखवण्याची समस्या कधीकधी स्वतःहून बरी होत नाही. या प्रकरणात, हे स्ट्रेप्टोकोकल म्हणजेच स्ट्रेप घशातील बॅक्टेरियाचा संसर्ग देखील असू शकतो. याकडे दुर्लक्ष केल्यास संधिवात ताप, मूत्रपिंडाची जळजळ आणि पू भरलेला फोड होण्याचा धोका असतो. अशावेळी डॉक्टरांकडून टेस्ट करून त्याचा उपचार लगेच सुरू होऊ शकतो.

**कॅन्सरचा धोका**

घसा खवखवण्याची समस्या कायम राहिल्यास हे देखील कॅन्सरचे म्हणजेच कर्करोगाचे लक्षण असू शकते. हे स्वरयंत्र, घसा किंवा टॉन्सिलपासून सुरू होऊ शकते. अशावेळी त्याकडे दुर्लक्ष न करता ताबडतोब डॉक्टरांकडे जाऊन चाचणी करून घ्यावी.

**गंभीर ॲलर्जी**

कधीकधी ॲलर्जीमुळे घसा खवखवणे आणि चिडचिड देखील होऊ शकते. धूळ, माती किंवा कोणत्याही फूड ॲलर्जीमुळेही हे होऊ शकते. या परिस्थितीत परिस्थिती बिघडू शकते. अशा वेळी डॉक्टरांची मदत घ्या.

**कोरोनाचा धोका**

कोरोनासारख्या धोकादायक आजारातही घसा खराब होतो. त्यामुळे घसा खवखवण्याकडे दुर्लक्ष करू नये. डॉक्टरांच्या मदतीने तुम्ही ते ओळखू शकता आणि ताबडतोब उपचार सुरू करू शकता.

**जीवनशैलीत बदल करा**

ॲसिड रिफ्लक्स किंवा गॅस्ट्रोएसोफेगल रिफ्लक्स रोगाच्या तीव्र समस्यांमुळे पोटातील आम्लामुळे घसा खवखवू शकतो. ऑटोइम्यून रोगांमध्ये, यामुळे वारंवार वेदना देखील होऊ शकतात. घसा खवखवणे दूर करण्यासाठी जीवनशैलीत बदल करणे आवश्यक आहे.

घसा खवखवणे खूप सामान्य आहे आणि सहसा काळजी करण्यासारखे काहीही नाही. तो सहसा आठवड्याभरात स्वतःच बरा होतो. पण, जास्त काळ राहिल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या.

घसा खवखवणे हे कमी करण्यात मदत करण्यासाठी आपण खालील उपाय करू शकता.

उपचार स्वतः कसा करावा

कोमट, खारट पाण्याने कोरडे करा (मुलांनी हे प्रयत्न करू नये), भरपूर पाणी प्या, थंड किंवा मऊ पदार्थ खा, धूम्रपान किंवा धुरकट ठिकाणे टाळा.

## अशोकायन

### आशेचा किरण

राजकीय अराजकता
पाहून 'आम आदमी '
झाला आहे हताश
कारण -
विकासाच्या नावावर
खजिना झालाय भकास ..

एक अवलिया दिसतोय
जो ठासुन म्हणतोय
मला महाराष्ट्र वाचवायचाय
द्या त्यालेही एक चान्स
काय दिवे लावतोय
बघायला हरकत नाय . . !
'राज 'निष्ठा सिध्द झाल्यास
मिळेल एक सशक्त पर्याय .



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# आई-बाबा आमच्या उज्वल भविष्यासाठी मतदान कराच

## रांगोळीच्या माध्यमातून १००% मतदान जनजागृती

■ महासागर प्रतिनिधी
कोंढाळी, दि. १७ :

देश घडवण्याची ताकद मतदारांमध्ये असते. यात युवा मतदारांनी राष्ट्र सेवा म्हणून आपल्या मतदानाचा हक्क बजावण्यासह मतदान साक्षरतेसाठीही सहभाग घेणे आवश्यक आहे. लोकशाहीत युवकांची भूमिका ही प्रत्येक देशात सिध्द झालेली आहे. अनेक देशात युवकांनी क्रांती केली आहे. भारतातही आपला युवा वर्ग अत्यंत सक्षम असून मतदारांच्या नोंदणीत असलेले मतदानाचे प्रमाण वाढविणे हे सुद्धा कोणत्या क्रांती पेक्षा कमी नाही, असे प्रतिपादन काटोल विधानसभा मतदारसंघाचे सह निवडणूक निर्णय अधिकारी व नायब तहसीलदार संजय भुजाडे यांनी केले.

लाखोटीया भुतडा हायस्कूल, कनिष्ठ महाविद्यालय व सी बी एस ई हायस्कूल कोंढाळी व निवडणूक विभाग यांच्या कडून निर्देशित स्विप कार्यक्रमाअंतर्गत संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सुधीर बुटे, प्रमुख अतिथी तालुका गट शिक्षण अधिकारी प्रदीपकुमार, जनबधू, राजस्व मंडळ अधिकारी सुरज सादतकर, कोंढाळी पोलीस



स्टेशन, राष्ट्रीय महामार्ग पोलीस, होमगार्ड यांचे अधिकारी, उपप्राचार्य कैलास थुल, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष रूपाली भुते,पर्यवेक्षक हरिष राठी, परिक्षा प्रमुख प्रिया धारपुरे, संजय आगरकर, लाखोटीया भुतडा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय व सीबीएसई हायस्कूलचे प्राचार्य केदार पवार सर्व शिक्षक विद्यार्थी-विद्याथीर्नी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

आप आपल्या भागातील शहरी, निम शहरी तसेच गावो गावचे मतदान १००% करून घेण्यासाठी सर्व मतदार, तसेच युवकांपर्यत निवडणूक आयोगाची भूमिका पोहचावी, युवकांच्या मनातील मतदान प्रक्रियेविषयी असलेल्या विविध शंकाचे समाधान व्हावे, मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या स्विपचे माध्यमातून मतदार साक्षरता चळवळीत युवकांचा सहभाग वाढावा याउद्देशाने कोंढाळी नगर पंचायत क्षेत्रातील लाखोटीया भुतडा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय व सी बी एस ई हायस्कूल चे प्रांगणातून सह निवडणूक अधिकारी संजय भुजाडे यांनी मतदार जागृती रॅलीला हिरवी झेंडी दाखवून विद्यार्थ्यांची मतदार जनजागृतीची भव्य दिव्य रॅली काढण्यात आली. या रूलीचे माध्यमातून नागरी भागातून एन सी सी पथक, बँड पथकाचे माध्यमातून मतदाता जनजागृती रॅली काढून, मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो, मतदार राजा जाग तू, शाहण्या सारखा वागु, या सारखे मतदान जनजागृती अभियानां अंतरगत हायस्कूलचे वतीने येथील मुख्य मार्गावर, चौका, चौकात, पथनाट्य, पोवाडे, व मतदान जन जागृतीचे विविध गीतांचे सादरीकरण करत मतदार जनजागृती करण्यात आली.

येथील विद्यार्थ्यांनी रांगोळी, भिंतीचित्र, चित्रकलेच्या माध्यमातून जनजागृती केली. यात आई-बाबा आमच्या उज्वल भविष्यासाठी मतदान करा असे बोलके आवाहन रांगोळीचे माध्यमातून करण्यात आले. हा कार्यक्रम घेण्यात आला होता. या प्रसंगी तालुका शिक्षण अधिकारी, जनबंधू यांनी लोकशाही प्रक्रियेपासून, सुशासन ते मतदानाची पवित्रता आणि युवा व सर्व मतदारांना मतदानापर्यत पोहचविण्यासाठी विद्यार्थ्यांनी आप आपल्यापरिने सहकार्य करावे असे संबोधन केले.

देशाच्या प्रगतीपासून ते गावपातळीपर्यतच्या समस्यापर्यत प्रत्येकजण हा विविध प्रकारच्या अत्यंत जबाबदारीने चर्चा करीत असतो. प्रत्येकाला विकास कामात बदल हवा असतो. ही प्रक्रिया आपल्या मतदानाच्या हक्कातून, कर्तव्यातून आपण पार पाडू शकतो. मतदान करणे हे जेवढे प्रत्येक नागरिकांचे मुलभूत कर्तव्य आहे तेवढेच त्याचे पावित्र्य जपणे हे देखील अत्यंत मोलाचे आहे असे मोलाचं मार्गदर्शन प्राचार्य सुधीर बुटे यांनी केले. मतदार जागृतीसाठी शैक्षणिक संस्थामधील चित्रकला, भिंतीचित्र, रांगोळी, पथनाट्य, पोवाडा, बँडपथक, मतदान अधिकार, संविधान अधिकार या विषयावरील सादरीकरण करणारे गुणवंत विद्यार्थ्यांना, कलाकारांना, चित्रकारांना मतदान साक्षरतेच्या चळवळीला अधिक रचनात्मक करण्यासाठी निवडणूक विभाग प्रोत्साहन पर पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. यात विद्यार्थ्यांनी आपल्या संकल्पना वापरुन जास्तीत जास्त नव मतदार वाढविण्यासाठी भर द्यावा असे आवाहन ज्येष्ठ नागरिक दुर्गा प्रसाद पांडे यांनी केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरिष राठी, तर आभार समीर लोणारे यांनी मानले.

# स्व. मातादिनलाल जैस्वाल शाळेत बालदिन उत्साहात



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १७ :

दाभा येथील साईनगर मधील स्व. मातादिनलालजी जैस्वाल शाळेत गुरुवार १४ नोव्हेंबर रोजी बालदिनाचा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष राजेश जैस्वाल,सचिव जयकिशोर जैस्वाल मराठी माध्यमचे मुख्याध्यापक बंडूजी जैस्वाल यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला.

सर्वप्रथम पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या फोटोला हार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांनी नाटिका, गाणे, फॅन्सी ड्रेस आदी कार्यक्रमातुन बालदिन साजरा केला. शिक्षकांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म दिन म्हणून बालक दिन का साजरा करतात या विषयी माहीती सांगीतली. आयोजनासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका नेहा वासाडे, उपमुख्याध्यापिका सुधा बांगर यांच्या मार्गदर्शनात सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# रीआन हॉस्पिटलच्या माणुसकीमुळे वाचला प्रतिभाचा जीव



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १७ :

दिनांक १६ नोव्हेंबर ला पारशिवनी तालुक्यातील नवेगाव खैरी येथे आई-वडिलांच्या घरी आपल्या दोन मुलांसह राहणारी ३४ वर्षीय प्रतिभा परतेती गेल्या काही महिन्यांपासून आजारी होती. घरात अठरा विश्वे दारिद्य आणि दोन मुलांचा सांभाळ करण्याची जबाबदारी काबाडकष्ट करून पार पाडणारी प्रतिभा आजारपणाने आणखीनच खचलेली होती. औषधोपचारासाठी पैसा नाही म्हणून मनातल्या मनात कुढत होती. ॲनिमिया, कावीळ, श्वासोच्छवासाचा त्रास, अंगदुखी, उलटी व मळमळ यामुळे तिला प्रचंड अशक्तपणा आला होता. काही दिवसापासून पोटात जेवण देखील जात नव्हते. तिला आता उठणे बसणे व श्वास घेणे देखील कठीण झाले होते. एकंदरीत तिची आरोग्यस्थिती पाहता शेजारच्यांना देखील काळजी वाटायला लागली होती. अशातच स्थानिक ग्रामपंचायत सदस्या वनिता वासनीक यांनी १३ नोव्हेंबरला आकाशझेप फाउंडेशनचे सचिव साक्षोधन कडबे यांना भ्रमणध्वनी द्वारा संपर्क साधून प्रतिभाची हकीकत सांगितली. साक्षोधन कडबे यांनी लगेचच रामटेक येथील रीआन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी बोलावले व हॉस्पिटलचे संचालक डॉ. प्रदीप बोरकर यांची भेट घेऊन प्रतिभाच्या एकूण परिस्थितीची जाणीव करून देत निःशुल्क उपचाराची विनंती केली.

डॉ.प्रदीप बोरकर यांनी विनंतीला मान देत प्रतिभाला दाखल करून घेतले आणि योग्य उपचार सुरू झाले. या दरम्यान डॉ. बोरकर यांचे मार्गदर्शनाखाली आरएमओ डॉ.श्वेता व चमूद्वारा सर्व प्रकारच्या रक्त तपासणी, दोन युनिट रक्तपुरवठा, योग्य उपचार आणि औषधे यांच्या साहाय्याने प्रतिभा १६ नोव्हेंबरला अगदी ठणठणीत झाली. मरणाच्या दारात उभी असणाऱ्या प्रतिभाला डॉ. प्रदीप बोरकरांच्या रूपात प्रत्यक्ष माणूसरुपी देव भेटल्याने तिचा जीव वाचला. अशा संवेदना सुखरूप होऊन घरी जाताना प्रतिभाने व्यक्त केल्या. यावेळी आई सोनाबाई धूर्वे, मुलगा आयुष परतेती यांनी डॉ. प्रदीप बोरकर, वैद्यकीय चमू, लाईफ लाईन रक्तपेढी आणि आकाशझेप फाउंडेशनचे सचिव व आम्ही भारतीय अभियानाचे मुख्य संयोजक साक्षोधन कडबे यांचे मनस्वी आभार मानले.

### बाईक रॅली काढत लाडक्या बहिणींकडून भूमिपुत्राचे स्वागत

■ महासागर प्रतिनिधी
भिवापूर, दि. १७ :

येथील महिला भगिनींनी बाईक रॅली काढत महायुतीचे उमेदवार सुधीर पारवे यांचे जोरदार स्वागत केले. लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी व विकासासाठी केलेल्या पाठपुराव्याची पावती म्हणून भूमिपुत्र असलेल्या सुधीर पारवे यांना मताधिक्य देण्याचा निर्धार यावेळी मतदार बंधू भगिनींनी केला. या सर्वांमध्ये भारतीय जनता पक्षाचे लोकप्रिय उमेदवार सुधीर पारवे सरस ठरत असल्याचे चित्र आहे. लाडकी बहीण, शेतकरी, युवक व सर्व घटकांमध्ये सुधीर पारवे यांचाच बोलबाला पाहायला मिळत आहे. गुरुवारी भिवापूर येथे काढण्यात आलेल्या प्रचार रॅलीस सुद्धा भिवापूर येथील महिला, पुरुष व युवक मतदारांनी प्रचंड प्रतिसाद दिला. सुधीर पारवे यांना पुन्हा भरघोस मतांनी निवडून विधानसभेत पाठवायचे असा निर्धार यावेळी उपस्थितांनी बोलून दाखवला.

यावेळी सर्वश्री वसंता पंधरे, चरणजीतसिंग अरोरा, विवेक ठाकरे, अविनाश चिमुरकर, आनंद गुप्ता, हिमांन्शु अग्रवाल, अनिकेत वराडे, धनंजय चौधरी, शेखर शेटे, जयप्रकाश बोराडे, अनिल समर्थ, प्रमोद रघुशे, संजय गुप्ता, आशुतोष मोरे, शरद आगे, राष्ट्रवादीचे सचिन चव्हान, नागेश देडमुठे, जालिंदर मेश्राम, किशोर पारवे, प्रशांत पारवे, नंदकिशोर हटवार, सोहेल हटवार, श्रावण वाघमारे, निलीमा नागोशे, निशा जांभुळे, वैशाली पेंदाम, सिता दुर्गे, वैशाली विश्वेकर, कल्पना पारवे, नेहा पारवे आदींसह मोठ्यासंख्येत महिला भगिनी उपस्थित होत्या.

### त्रिस्कंध ॲल्युमनी अँड एस्ट्रोलॉजस तर्फे कार्यशाळा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर दि. १७ :

रविवार दिनांक १७ नोव्हेंबरला त्रिस्कंध ॲल्युमनि अँड एस्ट्रोलॉजर्स असोसिएशन द्वारा प्रश्न आणि मुहूर्त या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा विदर्भ हिन्दी साहित्य संमेलन, उत्कर्ष हॉल, सिताबर्डी येथे दुपारी २ ते ५ या वेळात घेण्यात येणार आहे. यावेळी अष्टमंगल पध्दत तज्ञ, डॉ. ए.व्ही.मोहनदास, कार्यशाळेमध्ये ज्योतिष शास्त्राच्या दृष्टीने प्रश्न आणि मुहूर्त यावर विवेचन करतील. त्यासाठी शास्त्रीय दृष्टिकोनातून प्रश्न कुंडली, विविध माध्यमांद्वारे कवड्या, पान यांचा ज्योतिषीय प्राचीन ग्रंथांच्या आधारे संदर्भ घेऊन मार्गदर्शन करतील. या संधीचा सर्व ज्योतिष अभ्यासकांनी वैज्ञानिक दृष्टिकोन समजून घेऊन लाभ घ्यावा असे आवाहन त्रिस्कंध ॲल्युमनी असोसिएशनने केले आहे.

# शहीद सैनिक अक्षय भिलकर यांना स्मृतीदिनानिमित्त अभिवादन

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १७ :

भारतीय लष्करात सेवा बजावत असताना आणि बेळगाव येथे कर्तव्य बजावत असताना गेल्या वर्षी दि.१२ नोव्हेंबर रोजी शहीद झालेले रामटेकचे रहिवासी अक्षय अशोक भिलकर यांना त्यांच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. शहीद अक्षयच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दोन मिनिटे मौन पाळून भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

शहीद अक्षयच्या स्मरणार्थ भिलकर परिवाराच्या वतीने संत गाडगे महाराज समाज भवनात खुर्च्यांचे वाटप तसेच गाडगेबाबा मूकबधीर विद्यालय, रामटेक येथील एकूण ४० विद्यार्थ्यांना



गणवेश वाटप करण्यात आले.

स्मृती दिन सोहळ्यात एड. प्रफुल्ल अंबादे, रणजित ढोक, प्रतीक्षा चामलाटे, बबन क्षीरसागर, अरुण भिलकर, विलास भिलकर, रघुनाथ वाघमारे, दीपक भिलकर, सुनील भिलकर, मनोज मंगळकर, प्रवीण शिरपूरकर, श्रीराम शिरपूरकर, वैशाली क्षीरसागर, लक्ष्मीबाई भाऊराव, प्रवीण पाटील, रघुनाथ वाघमारे, बबिता कोठेकर, शोभना क्षीरसागर, जयश्री भिलकर, दीपा भिलकर, नंदा भिलकर, सुनीता भिलकर, पल्लवी दाडोरे, आशू भिलकर, खरोजा शंभरकर, प्रभाला भास्कर, शुभम निंबळे, हाशिम कुरेशी, सोहेल शेख, कार्तिक येयेवार, प्रणय मरसकोल्हे, गौरव महाजन, यादोराव दाडोरे सह आदी नागरिक उपस्थित होते.

# अचल किल्ला स्पर्धेत अदविक कोहळेचा जंजीरा प्रथम

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १७ :

सृष्टी सौंदर्य बहुउद्देशीय संस्था रामटेक द्वारा १५ नोव्हेंबरला किल्ले स्पर्धेचे आयोजन केले होते. एकुन १२ स्पर्धकांनी भाग घेतला होता. स्पर्धा मध्ये चल व अचल असे दोन भाग केले होते. अचलमध्ये घरी तयार केलेले मातीचे किल्ले व चल मध्ये प्रदर्शनीत ठेवलेले किल्ले होते. किल्ले स्पर्धा विषयी बोलताना सृष्टी सौंदर्य परिवारचे अध्यक्ष ऋषिकेश किंमतकर म्हणाले की रामटेक परिसर निसर्ग व विविधतेने नटलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाच



स्मरण, त्यांचे आदर्श जुन्या - नवीन पिढीला पुन्हा पुन्हा कळावे ज्यामुळे राष्ट्रबांधणी कार्यात प्रेरणा मिळेल म्हणून दरवर्षी किल्ला स्पधार्चे आयोजन केले जाते. अचल मातीच्या किल्हा स्पर्धा मधे अदविक कोहळेच्या जंजीरा प्रथम, सर्वज्ञ येरपुडे व रुगवेद बारोकर द्वितीय, राजन्या किंमतकर व मिराई पब्लीक स्कुल तृतीय क्रमांकवर राहिल्या. चल किल्ला स्पर्धा मध्ये तृनिका धमगाये व प्रथमेश बांते प्रथम, हिमांसी काठोके व रुद्र वाडीकर द्वितीय, हर्ष कांबळे व सिदेश वाघधरे तृतीय, तारिया शेख व आदित्य बरबटे यांना प्रोत्साहन पुरस्कार मिळाले. किल्ले स्पर्धा यशस्वीतेकरीता भूषण देशमुख, वेदप्रकाश मोकदम, नंदेश शेळ्के, रविंद्र नारनवरे, सारंग पंडे, राजेश बाकडे, राजेश किंमतकर, लक्ष्मीकांत तीबुडे सहित आदिनी पयत्न केले.

# अश्विन बैस यांची नागपूर जिल्हा काँग्रेसच्या कार्याध्यक्षपदी निवड



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १७ :

येथील आदर्शवाडी मधील रहीवाशी युवक काँग्रेसचे राज्यसचिव अश्विन बैस यांच्या क्रियाशील कायार्ची दखल घेत काँग्रेस पक्षाने त्यांची नागपूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या प्रभारी कार्याध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. याबाबतचे नियुक्तीपत्र त्यांना देण्यात आले. अश्विन बैस यांनी आपल्या नियुक्तीबद्दल माजी मंत्री सुनील केदार यांचे तसेच कॉंग्रेस कमिटीचे आभार मानले. नियुक्ती बद्दल वाडी शहर काँग्रेसच्या वतीने शुक्रवारी आदर्शवाडी येथील त्यांच्या निवासस्थानी अभिनंदन व सत्कार समारोह आयोजित करण्यात आला.

अश्विन बैस यांच्या युवक काँग्रेसच्या माध्यमातून केलेल्या कायार्ची प्रशंसा करून पक्षाने त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी ते निश्चितच दमदारपणे पूर्ण करतील , तसेच कॉंग्रेस व युवक कॉंग्रेसच्या कार्य वाढीसाठी चांगली संधी असल्याचे मनोगत अनेकांनी व्यक्त केले. सत्काराला उत्तर देतांना अश्विन बैस यांनी सांगीतले की सर्वांच्या सहकार्यानेच ही जबाबदारी मिळाली असून पुढील वाटचालीसाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

यावेळी माजी नगराध्यक्ष राजेश थोराणे, वाडी शहर अध्यक्ष शैलेश थोराने, वाडी शहर शिवसेना अध्यक्ष मधु मानके पाटील, पंकज फलके,किशोर नागपुरकर, अरूणा पगारे, प्रमिला पवार, गौतम तिरपुडे, भीमराव कांबळे, अशोक गडलिंगे पंडित भोरगड़े, मीनाक्षी पाटील, फुलन पटले नीता मडावी, रीना चिमणकर, रतन चनकापुरे, गोमाजी भोवते, मिथुन वायकर, सुरेश थोराणे, संजय जीवनकर, आशिष गौरखेडे, मनोज भागवतकर, हरीश टेंबरे, पवन अतकर, शुभम शेंडे, शाहरुख खान, मानव फुले, लादेन बाणेवार, मंगेश राजपूत, सागर बैस, मृणाल उके, मानव फुले,शुभम हाडके, रितेश दिग्रसे, अनिकेत तितरमारे,मयूर लोणारे, सूरज किंदर्ले, रोहित रेवतकर, मयूर कुडे, अभिनव वड्डेवार, अमेय सरोदे, आकाश साठवाने उपस्थित होते.

# श्रीरामभक्त हनुमान सेवा ट्रस्ट तर्फे काकड आरतीची सांगता

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १६ :

श्रीरामभक्त हनुमान सेवा ट्रस्ट नरेंद्रनगर तर्फे कार्तिक पोर्णिमा आणि काकड आरतीची सांगता करण्यात आली. कार्तिक पौर्णिमेनिमित्ताने श्रीरामभक्त हनुमान सेवा ट्रस्टतर्फे सकाळी पूजा-अर्चना करुन काकडा आरतीला सुरुवात झाली. यावेळी नरेंद्रनगर परिसरातून भजन मंडळींच्या सहभागात प्रभातफेरी काढण्यात आली.

याप्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष दिवाकर पाटणे यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रस्टचे विश्वस्त



सुरेश इंगोले, विनोद रामेडवार, विठोबा सलोटकर, अनुप बुराडे, रत्नाकर गांगमवर, प्रमोद महाजन, महिला पदाधिकारी चंदा चव्हाण, मालती महाजन, पुष्पा पेठे, आशा इंगोले, राहणी निमजे, दुर्गा मालेवार, माधुरी बाळबुद्धे, कल्पना नासरे, संध्या शांडिल्य, मंगला बुराडे, शकुंतला माहुलकर, छाया कळंबे,लीना वाकोडीकर, लीला मेहर, छाया मोहिते, शिल्पा खडसे, चंदा माहुलकर, शिल्पा खडसे, माणिक आसकर, अनुराधा जाधव आदी उपस्थित होते.

# ३ टोळ्यांतील २२ गुन्हेगार तडीपार

**नागपूरः** आगामी विधानसभा निवडणुकी दरम्यान शहरात कोणतीही अनुचित घटना किंवा प्रकार घडू नये म्हणून पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी सर्व झोनच्या डीसीपींना अधिकाधिक गुन्हेगारांवर प्रतिबंधक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

अनिकेत राजेंद्र रक्षे (26) रा. हिरणवार लेआऊट, जयताळा, सौरभ उर्फ गोलू संजय रहाटे (21), संदीप बिंदेश्वरी गुप्ता (23), हर्षल उर्फ बिट्टू सुधाकर कावरे (22), मित गणेश कार्की (20), कार्तिक उर्फ टिपऱ्या सूर्यकांत चव्हाण (20), सिद्धार्थ देविदास बनकर (25), पंकज कैलाश पलसानिया (26), दिनेश उर्फ भद्या शंकर आकोडे (32), अजिंक्य दिनकर नवरे (22), जितेंद्र तेजसिंग वाघमारे (26) सर्व रा. कबीरनगर, अभिनव उर्फ दाऊद उखंडराव सोमकुवर (25) रा. त्रिमूर्तीनगर, अविनाश उर्फ मंगल संजय मोहोड (22), पारस उर्फ लल्लू परसाजी धुर्वे (24), सूरज भारत गायकवाड (23) तिन्ही रा. इसासनी, राहुल गौतम राऊत (23), विकास उर्फ विक्की मोहन रहांगडाले (32) दोन्ही रा. भीमनगर, पवन उर्फ किस्सी तुळशीराम कोरडे (24), श्याम राममूर्ती शर्मा (22), नीलेश उर्फ क्लोमिक्स भीमराव मांडस्कर (25), आकाश उर्फ बाका सतीश सहारे (21) आणि प्रदीप काशीनाथ आकोडे (30) सर्व रा. इंदिरामातानगर, एमआयडीसी अशी तडीपार केलेल्या गुन्हेगारांची नावे आहेत.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **MOHD NAUSHAD ALAM.** NOW MY NEW NAME IS **M NAUSHAD ISAHAK SHEKH.**
**ADD :** GOVIND COLONY MENGAPUR BHANDARA 441809.

MY OLD NAME WAS **GULSHAN MOHAMMED NAUSHAD.** NOW MY NEW NAME IS **GULSHAN BI NAUSHAD SHEKH.**
**ADD :** GOVIND COLONY MENGAPUR BHANDARA 441809.

MY OLD NAME WAS **SHOAIB KHAN JAFARULLA KHAN PATHAN.** NOW MY NEW NAME IS **SHOAIBKHAN JAFARULLAKHAN PATHAN.**
**ADD :** WARD NO 15 KUMBHAR PETH ISLAMI PURA NARKHED NAGPUR RURAL 441304.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# भक्तिमार्ग

प्रत्येक ऋतूची खासियत असते. प्रत्येक ऋतू नवीन भक्तीपर्व घेऊन येत असतो. थंडीमध्ये पार पडणारी कार्तिकस्नानादी व्रतवैकल्यं, त्रिपुरी पौर्णिमेला झळाळून उठणारी गोपुरं, पणत्यांनी सजणारे देवळांचे गाभारे, त्यानंतर येणारं खंडोबाचं नवरात्र या सगळ्या वातावरणात भक्तीपर्व सुरू राहतं. आता प्रतीक्षा आहे याच आल्हाददायक पर्वाची. तिचं आगमन होवो आणि वातावरणातील भारलेपण वेगळ्या पातळीपर्यंत पोहोचो...



## भक्तीमय ऋतूपर्व

भक्ती विशेष

नवरात्र, दसरा, दिवाळी हे उत्सवपर्व अपार आनंद देणारं. निसर्गात विविध रंगांची उधळण होत असताना त्यात सर्जनाचं नवपर्व जागवणारे हे सण म्हणजे संस्कृतीचा आत्मा आणि सर्वसामान्यांचा प्राण... चेतना, संवेदना, सकारात्मकता, उत्साह, आनंद आदी भावनांना साद घालणारे हे क्षण आयुष्याला नवा अर्थ देऊन जातात हे कोणीही नाकारणार नाही. यंदा या सणांवर वरुणराजाचा वरदहस्त राहिला आहे. ढासळत्या पर्यावरण संतुलनाचा धसका असताना दर वर्षी जूनच्या पहिल्या-दुसऱ्या आठवड्यात हृदयाची धडधड वाढते ती पाऊस वेळेवर येणार का आणि पडणार तर किती पडणार या चिंताग्रस्त विचाराने... पण यंदा त्याची कृपादृष्टी झाली आणि शेत-शिवारांमध्ये हिरवी माया भरघोस पसरली. भिजलेल्या मातीत पाय रुतवून हिरवा चारा खाताना गुरंवासरं तृप्तीने हंबरली. या तृप्तीतच सणांचं पर्व सजलं आहे. दिवाळीपर्यंत साथ देणारा पाऊस काहींच्या कपाळावर आठ्या उमटवून गेला असला तरी पाऊसप्रेमींनी त्याला बोल लावू दिलेला नाही. असे हिरवे दिवस मनसोक्त अनुभवल्यानंतर सर्वांनाच वेध लागले आहेत ते गुलाबी थंडीचे. पावसाळ्यानंतर अवतरणारी आल्हाददायक थंडी सुखावलेल्या वृत्तींना नवे उमाळे देणारी आहेच त्याचबरोबर आरोग्यसंवर्धकही आहे. पचनशक्ती सशक्त करणारी ही थंडी शरीरसंपदेचं वरदान देते. अशा प्रकारे तनामनाच्या स्वस्थ अवस्थेत सकारात्मक जाणिवा उन्नत होतात आणि मन सगळीकडे भरुन उरणाऱ्या सांस्कृतिक वातावरणात रमून जातं.

दिवाळी आणि थंडी हे समीकरण अद्यापही जुन्या पिढीच्या मनात ठाम आहे. अभ्यंगस्नानासाठी पहाटे उठल्यावर दातांवर दात वाजत असल्याच्या आठवणी प्रत्येक ज्येष्ठ नागरिक सांगतो. गेल्या काही वर्षात हे समीकरण बिघडलं आहे. आता दिवाळीतली थंडी अभावानेच अनुभवायला मिळते. पण काही दिवसातच थंडीचं साम्राज्य पसरतं. सध्या आपण याच प्रतीक्षेत आहोत. अशा या थंडीत पार पडणारा कार्तिकस्नानाचा नियम, त्रिपुरीपौर्णिमेचा उत्सव, त्यानंतर येणारं खंडोबाचं नवरात्र हे सगळे सण थंडीच्या साक्षीनेच पार पडतात. शेवटी पावसाची असते तशी थंडीचीही वेगळीच मौज असते. आता पावसाळ्यातल्या हिरवाईवर सोनेरी वर्ख चढू लागतो. जमिनीतला ओलावा किंचीतसा सुकू लागतो. या दिवसात फुलांचा बहर काहीसा कमी होत असला तरी ठराविक फुलं रसरसून फुललेली दिसतात. बोरं, आवळे, पेरु यासारखा मेवा चाखायला मिळतो. रसरशीत गाजरं, हिरवागार मटार, हिरव्यागार पालेभाज्या, रसरशीत शेंगा, कोवळा हुरडा, टपोऱ्या दाण्यांनी भरलेले हरबऱ्याचे घाटे, दात रुतले तर दूध निघावं अशी कोवळी चविष्ट कणसं हा सगळा संपन्न खजिना दिसतो तो थंडीच्या मनमस्त ऋतूमध्ये... म्हणूनच या ऋतूचं आपल्याला कोण कौतुक असतं.

थंडीचं आगमन झालं की उठल्यानंतर जमिनीवर पाय टेकवताच अंगभर शिरशिरी येते. ही थंड लहर नसानसांमध्ये पोहोचते. धुक्याचा दाट थर अगदी खिडकीलगत पोहोचलेला दिसतो. अगदी फर्लांगभर लांबही नजर जाऊ नये असं दाट धुकं पसरतं. पानापानांवर गारठलेले दवबिंदू अवतरलेल्या थंडीची साक्ष देतात. या दाट दुलईला भेदून काही चुकार किरणं जमिनीपर्यंत पोहोचतात पण ती कमालीची क्षीण असतात. प्रखरता, उष्णता हे शब्दही त्यांच्या आसपास फिरु शकत नाहीत. अगदी डोक्यावर आला तरी सूर्याची प्रखरता जाणवू नये असे हे दिवस असतात. आता अशाच दिवसांची प्रतीक्षा आहे. एकूणच थंडीमधला माहोलच उत्सवी असतो. सर्वप्रथम दिवाळीचा उत्साह, फटाक्यांचा वास, नव्या कपड्यांची सळसळ यांची मौज. नंतर खास थंडीसाठी म्हणून झालेली स्टाईलिश, ऊबदार कपड्यांची खरेदी आनंदात भर घालते. रंगीबेरंगी मफलर, आकर्षक आणि डॅशिंग लूक देणारी जॅकेट्स, शानदार शॉल्स, स्वेटर्स, स्टोल्स आदींच्या वापरामुळे आपला लूकच बदलून जातो. थंडीपासून बचाव करणारी ही ऊबदार प्रावरणं व्यक्तिमत्त्वालाही अनोखी झळाळी देतात. हा बदल अगदी हवाहवासा वाटतो. त्यातच सुरू होते लग्नसराई... ही तर अनोखी पर्वणी. उन्हाळ्याच्या किचकिचाटात साजऱ्या होणाऱ्या लग्नसमारंभांपेक्षा हिवाळ्यात साजरे होणारे लग्नसमारंभ विशेष खुमासदार ठरतात. मंडळी या समारंभाचा निवांतपणे आनंद लुटू शकतात. म्हणूनच हे दिवस विशेष आनंद देऊन जातात.

या दिवसात आहारातला बदलही हवाहवासा वाटणारा... गरमागरम सूप, पानात पडणारी गरम पोळी अथवा भाकरी,या दिवसात आवर्जून केली जाणारी बाजरीची भाकरी, तिळाचं कूट वापरुन तयार होणारे रुचकर आणि खमंग पदार्थ, ताटाची डावी बाजू सजवणारी सॅलेड्स, चटकदार उसळी, अन्य तळलेले पदार्थ या सर्वांमुळेच थंडीतील भोजनाला एक वेगळीच चव मिळते. एरवी फारसे केले न जाणारे काही पदार्थ खास थंडीतच केले जातात. त्यामुळे जिभेची रुची वाढली नाही तरच नवल! साधी कढी ती काय, पण थंडीत खिचडीसवे गरमागरम कढीची चव अशी काही अफलातून लागते की विचारु नका. गरम असो वा तिखट, सगळेच पदार्थ या दिवसात विशेष रुचकर लागतात. थंडी रंगीन आहे. तो रंगांचा महोत्सव आहे. उन्हाळ्यात गडद रंग फारसे खुलून दिसत नाहीत. पावसाळ्यात सगळेच रंग मातकट भासतात. थंडीत मात्र प्रत्येक रंगाचा सन्मान होतो. कुठलाही भडक कपडा अंगावर छान खुलतो. तो मिरवताना संकोच वाटत नाही. हा रंगांचा महोत्सव लग्नाच्या मंडपात सजतो, फिरायला बाहेर पडणाऱ्या भटक्यांच्या अंगावर शोभतो, गॅदरिंगच्या निमित्तानं स्टेजवर मिरवणाऱ्या लहानग्यांच्या शरीरावर झळकतो आणि थंडीत पार पडणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांना होणाऱ्या गर्दीतही झळकतो. रंगांची ही नक्षी, रंगांचं हे सामर्थ्य चित्तवृत्तीवर सकारात्मक परिणाम केल्याशिवाय रहात नाही.

आल्हाददायक वातावरणात व्यायाम करणाऱ्यांची संख्या काही पटीनं वाढते. उन्हाची तलखी नाही की पावसाची रिपरिप नाही, घामाची नकोशी चिकचिक नाही, विचित्र प्रकारे दाटलेला कोंदटपणा नाही... अशा मोकळ्याढाकळ्या वातावरणात व्यायाम करण्याचा आनंदच काही वेगळा. विशेष म्हणजे दिवस लहान आणि रात्र मोठी असल्यानं शरीराला पुरेशी विश्रांती मिळते. ऊबदार दुलईत शांत झोप मिळते आणि सकाळी शरीर प्रसन्न चित्तानं व्यायामाला सिद्ध होतं. मनाची तयारी नसताना शरीराची साथ मिळवणं हे खूप अवघड काम आहे पण थंडीमध्ये मनाची अवस्था चांगली रहात असल्यानं शरीराची ऊर्जा टिकून राहण्यास मदत होते हा मुख्य फायदा आहे. म्हणूनच थंडी हा अनेकांचा मनपसंत ऋतू आहे.

एकूणच हे दिवस तणावरहित अवस्थेची अनुभूती देतात. कुठल्याही कार्यक्रमामध्ये मध्यंतर असतो ना, तसा असतो हा काळ! हिंदीत एक छान शब्द आहे, ठहराव... अर्थात थबकणं.. पुढच्या वेगवान प्रवासासाठी हे थबकणं गरजेचं असतं. सतत वेगावर स्वार होऊन केलेल्या प्रवासात काही काळासाठी मंदावलेला वेग एक प्रकारचा निवांतपणा देऊन जातो. या निवांतपणात खूप काही साधता येतं. या दिवसात रंगणाऱ्या, बौद्धिक भूक भागवणाऱ्या कार्यक्रमांचा आस्वाद घेता येतो, सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी झोडता येते, वैचारिक कार्यक्रमांना उपस्थित राहून मेंदूची क्षमता वाढवता येते, मुलाबाळांच्या गॅदरिंगचा आनंद अनुभवताना हळूच आपल्या गतकाळाच्या कुशीत शिरता येतं, कुटुंबिय अथवा मित्र-मैत्रिणींबरोबर सहलीचा आनंद उपभोगता येतो. हा बदल मनस्वी आनंद देणारा आहे.



## का जुळवायची पत्रिका ?

हिंदू संस्कृतीत विवाह हा संस्कार मानला जातो. लग्न ठरवताना वधू आणि वराची पत्रिका पाहिली जाते. गुणमिलन केलं जातं. पत्रिका जुळली तर बोलणी पुढे सरकतात. आजच्या जगात पत्रिकेपेक्षाही मनं आणि स्वभाव जुळणं गरजेचं असलं तरी पत्रिकेचं महत्त्व आजही कायम आहे. गुणमिलनाची ही परंपरा प्राचीन आहे. लग्नाआधी पत्रिका जुळायला हवी का? पत्रिका पाहणं गरजेचं आहे का? असे अनेक प्रश्न आपल्याला पडतात. या प्रश्नाचं अचूक उत्तर देता येणं शक्य नसलं तरी ज्योतिषशास्त्रानुसार लग्नाआधी पत्रिका जुळवल्याने अनेक लाभ होतात. त्यामुळे पत्रिका पाहणं गरजेचं आहे. ज्योतिष शास्त्रानुसार पत्रिकेत ३६ गुण असतात. लग्न ठरवताना कमीत कमी १६ गुण जुळणं आवश्यक मानलं जातं. या लग्नसराईच्या हंगामात बऱ्याच पत्रिका जुळवल्या जातील. म्हणूनच पत्रिका जुळवण्याची नेमकी गरज आपण जाणून घ्यायला हवी.

लग्नाच्या बंधनात बांधल्या जाणाऱ्या दोन व्यक्तींचं आपसात पटेल का, हे पत्रिका जुळवल्याने कळू शकतं. दोघांचं



सहजीवन कसं असेल याबद्दल मात्र कोणतंही भाष्य करता येत नाही. पत्रिका जुळवण्याच्या या विधीत नाडी जुळण्याला प्रचंड महत्त्व आहे. नाडी माणसाचं मन आणि मानसिक ऊर्जेचं प्रतीक मानली जाते.

जाणून घ्या

व्यक्तीचे वैयक्तिक संबध मन आणि भावनेवर अवलंबून असतात. त्यामुळे एकमेकांसोबत आयुष्य घालवण्याच्या तयारीत असलेल्या दोन व्यक्तींमध्ये प्रेमभाव निर्माण होईल की नाही, हे पत्रिकेद्वारे कळतं. त्यामुळे लग्नाआधी पत्रिका जुळती आहे का हे बघणं योग्य ठरतं.

## रामायण आणि महाभारतातलं साम्य काय?

**महाभारत आणि रामायण ही हिंदू धर्मातली मोठी महाकाव्य... या दोन्ही घटनांचा कालखंड वेगळा... रामायण त्रेतायुगात तर महाभारत द्वापारयुगात घडलं. या दोन्ही महाकाव्यांच्या कालखंडात अनेक युगांचं अंतर होतं. असं असतानाही त्यात अनेक साम्य आढळून येतात. कधी या साम्यांचा विचार केला जात नसला तरी याबद्दल जाणून घेणं रंजक ठरू शकतं.**

वाल्मिकी रामायणानुसार रामाला चौदा वर्षांचा वनवास देण्यात आला होता. कैकयीने आपल्या या पुत्राला वनवासात पाठवलं. दुसरीकडे महाभारतात सारीपाटात हरल्यानंतर पांडवांना १३ वर्षांचा वनवास आणि १ वर्षाचा अज्ञातवास देण्यात आला. दुर्योधनाने त्यांना ही शिक्षा दिली.

* सीता आणि द्रौपदी यांचा जन्म आईच्या गर्भातून झाला नव्हता. या दोघीही अयोजिका होत्या.

* या दोन्ही ग्रंथांचे नायक म्हणजे राम आणि अर्जुन. रामाने सीतेशी विवाह करताना शिवधनुष्य पेललं तर अर्जुनाने माश्याच्या डोळ्याला लक्ष्य करून पण जिंकला. या दोन्ही नायिकांचं स्वयंवर आयोजित करण्यात आलं होतं.

* हनुमान आणि जामुवंत ही रामायणातली पात्रं महाभारतातही दर्शन देऊन जातात. हनुमानाकडे गदा होती तसंच भीमही गदाधारी होता. राम आणि



युधिष्ठिर यांचं आपल्या भावंडांवर खूप प्रेम होतं.

जाणून घ्या

* यातील महत्त्वाचं साम्य म्हणजे रामायण आणि महाभारत स्त्रीमुळे घडलं. रामायणात सीतेचा तर महाभारतात द्रौपदीचा अपमान झाला. या दोन्ही महाकाव्यांमध्ये सत्याचा विजय झाला. दुर्जनांचा नाश झाला आणि धर्माची स्थापना झाली.

## चित्रं राधा-कृष्णाचं

**सहजीवन आनंदी असावं असं प्रत्येक जोडप्याला वाटत असतं, पण अनेक कारणांमुळे दोघांमध्ये वाद निर्माण होतात. सुखी संसाराला नजर लागते आणि एकमेकांबद्दलची आपुलकीची भावनाही कमी होते. अशा परिस्थितीत वास्तूशास्त्राशी संबंधित काही उपायांनी सहजीवन सुखी आणि आनंदी करता येऊ शकतं. अशाच उपायांविषयी...**

फेंगशुई शास्त्र अधिकाधिक सकारात्मक ऊर्जेवर भर देतं. सकारात्मक ऊर्जेसाठी कमीत कमी खर्च आणि लाभदायक उपाय करण्याकडे या शास्त्राचा कल आहे. घरात काही चित्रं लावून सकारात्मक ऊर्जा मिळवता येते. भारतीय वास्तूशास्त्रातही घरात तसबीर लावण्यावर भर देण्यात आला आहे. त्यातही भगवान श्रीकृष्ण आणि त्याच्या आयुष्याशी संबंधित चित्रं किंवा तसबीरी लावल्याने दांपत्यजीवनात आनंद निर्माण होऊ शकतो.

* भगवान श्रीकृष्णाला कर्मयोगी समजलं जातं तसंच प्रेम आणि आनंदाचं प्रतीक म्हणून श्रीकृष्णाकडे पाहिलं जातं. म्हणूनच बासरी वाजवणारा श्रीकृष्ण आणि त्याच्यासह राधेचा फोटो किंवा चित्र घराच्या दक्षिण-पश्चिम कोपऱ्यात लावल्याने



नात्यांमध्ये आपुलकी आणि प्रेमभाव निर्माण होतो आणि टिकून राहतो.

* बागेत उभे असलेले किंवा बसलेले राधा-कृष्ण आणि त्यांच्या आजूबाजूला मोर असं चित्र असेल तर अधिक लाभ होऊ शकतो. कौटुंबिक संबंध सुधारण्याच्या दृष्टीने हे चित्र लाभदायी ठरत असल्याचं वास्तुशास्त्र सांगतं.

* राधा आणि कृष्णाचं चित्र ईश्वरभक्तीचं प्रतीकही मानलं जातं. अशा चित्रामुळे सहजीवनातली निरसता संपून आनंद फुलतो. श्रीकृष्णाच्या मुकुटातलं मोरपीस सुख आणि समृद्धीचं प्रतीक असल्याने घरातलं वातावरणही उत्साही राहतं.

वास्तु टिप्स

## विदेशातली हिंदू मंदिरे

**हिंदू धर्माचे लोक जगभरात पसरले आहेत. हिंदूंनी आपली संस्कृतीही त्या त्या देशात नेली. म्हणूनच हिंदू-देवीदेवतांची मंदिरं जगभरात पसरली आहेत. ही मंदिरं त्या देशातली प्रमुख पर्यटन स्थळंही बनली आहेत. अनेक मंदिरांमध्ये हिंदूपेक्षा परदेशी पर्यटकांचीच जास्त गर्दी असते. जगभरातल्या अशाच काही प्रसिद्ध हिंदू मंदिरांविषयी....**



कंबोडियात अंगकोर वट मंदिर आहे. हे जगातल्या मोठ्या हिंदू मंदिरांपैकी एक आहे. हे भगवान विष्णूचं मंदिर आहे. याची निर्मिती बाराव्या शतकात झाली असून राजा सूर्यवर्मणाम द्वितीय याने हे मंदिर बांधलं होतं.

* मलेशियात श्री सुब्रमण्यम देवस्थान आहे. या गुफेबाहेर मुरूगन या देवतेची मूर्ती आहे. ही मुरूगनची सर्वात उंच मूर्ती मानली जाते. १८९० मध्ये लालकृष्ण पिल्लई यांनी या मूर्तीची स्थापना केली होती.

* ऑस्ट्रेलियात दक्षिण भारतीयांचं मुरूगन मंदिर आहे. हे मंदिर सिडनीत आहे. परिसरातल्या भाविकांमध्ये हे मंदिर लोकप्रिय आहे.

तीर्थक्षेत्र

* घानासारख्या आफ्रिकी देशात हिंदू मठ आहे. या मठाची स्थापना स्वामी घनानंद सरस्वतींनी केली होती. या ठिकाणी आफ्रिकी वंशाचे लोक हिंदू धर्मातले सगळे विधी करतात.

* इंग्लंडमध्ये श्री व्यंकटेश्वर बालाजी मंदिर आहे. युरोपातलं भगवान व्यंकटेश्वराचं हे पहिलं मंदिर. याठिकाणी १२ फुटांची विष्णू मूर्ती आहे.

* लंडनमध्ये स्वामीनारायणाचं मंदिर आहे. या मंदिराचं उद्घाटन १९९५ मध्ये करण्यात आलं.

* अमेरिकेत राधा माधवधाम आहे. भारताबाहेरच्या सर्वात मोठ्या हिंदू मंदिरांमध्ये या मंदिराचा समावेश होतो. या मंदिराची स्थापना स्वामी प्रकाशानंदांची केली होती.

* नेपाळमध्ये हिंदू संस्कृती नांदते. इथे पशुपतीनाथाचं मंदिर आहे. या मंदिराची स्थापना ११ व्या शतकात करण्यात आली होती. या मंदिरात शंकराची चार मुखांची मूर्ती आहे.

## तंत्रज्ञानाचा वापर ठेवा मर्यादित!



**आजच्या जगात तंत्रज्ञानाचा वापर प्रचंड प्रमाणात वाढलाय. जो तो तंत्रज्ञानाच्या मागे लागल्याचं दिसून येतं. प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन आहे. व्हॉट्सअॅपवर तासनतास गप्पा मारल्या जात आहेत. अशा परिस्थितीत आयुष्याची लय बिघडू शकते. तंत्रज्ञानाचा वापर करताना काही गोष्टींकडे लक्ष देणं गरजेचं आहे. याविषयी जाणून घेऊ या...**

कोणत्याही गोष्टीचा अतिवापर घातकच ठरतो. इंटरनेटही त्याला अपवाद असू शकत नाही. आता इंटरनेटच्या अतिवापराचे दुष्परिणाम दिसू लागले आहेत. घरातली माणसं एकमेकांशी बोलेनाशी झाली आहेत. कौटुंबिक कहलांसोबतच गुन्हेही वाढत चालले आहेत.

जागृती

* इंटरनेटमुळे लोक एकमेकांपासून दूर जात आहेत. एकमेकांशी चुकीचं वागत आहेत. इंटरनेट हे एक व्यसनच आहे. व्यसन माणसाला आयुष्यातून उठवतं. व्यसनाची नशा अशी चढते की कशाचाही विचार मनात येत नाही. चांगलं-वाईट सगळंच मागे पडतं. आज प्रत्येकाच्या हाती यंत्र आहे पण त्यामुळे जिवंत माणसं परकी झाली आहेत. खेदाची बाब म्हणजे कुणालाही याची जाणीव उरलेली नाही.

* तंत्रज्ञानाचा वापर जरूर करावा पण त्याला मर्यादा असणं गरजेचं आहे. याचा वापर कामापुरता व्हायला हवा. घरातला वेळ कुटुंबियांसाठी असला पाहिजे. घरातल्या सदस्यांमध्ये प्रेम, करूणा आणि आपलेपणा असला पाहिजे. यासाठी तंत्रज्ञानाला मर्यादेतच ठेवा.

## धर्म आणि विज्ञानाची सांगड

धर्म आणि विज्ञान एकमेकांना पूरक आहेत. धर्म माणसाला आतून सुंदर बनवतो तर विज्ञानामुळे माणसाचं आयुष्य सुधारतं. विज्ञानाशिवाय धर्म आणि धर्माशिवाय विज्ञान अपूर्ण आहे. या दोन्ही गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या असल्या पाहिजे. धर्म आणि विज्ञान एकमेकांशिवाय राहू शकत नाहीत. धर्म आणि विज्ञान यांचा एकमेकांशी असलेला ताळमेळ माणसाला अनेक अर्थांनी सुंदर बनवू शकतो. या दोन्हींच्या मदतीने अखिल मानवजातीचं कल्याण होऊ शकतं. धर्म आणि विज्ञानाचा समन्वय गरजेचा नाही तर अनिवार्यही आहे. विज्ञानापासून धर्म आणि धर्मापासून विज्ञान वेगळं करता येत नाही. धर्मवादी आणि विज्ञानवादी अशी कोणतीही संज्ञा असू शकत नाही. दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यांची सांगड घातली गेली पाहिजे.

धर्म असतो तिथे विज्ञानाची गरज कमी होते आणि विज्ञानवादी जगात धर्माचं महत्त्व थोडं कमी होतं. असं असलं तरी एकमेकांशिवाय या दोन्ही गोष्टी अपूर्ण आहेत हे लक्षात घ्यायला हवं. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर माणसाला या दोन्ही गोष्टींची आवश्यकता असते. एकमेकांना अधिक सक्षम बनवण्याच्या दृष्टीने विज्ञान आणि धर्माने एकत्र असणं गरजेचं आहे. मुळात आपण केव्हाच विज्ञानाला धर्माशी जोडलं आहे. ऋषी-मुनींनी धर्माची सांगड विज्ञानाशी



घातली. आपल्या अनेक धार्मिक संकल्पनांना वैज्ञानिक आधार आहे. त्यांनी विज्ञानातली व्यावहारिकता शोधून काढली. त्याचं महत्त्व समजावून सांगितलं.

हिंदूंच्या धर्मग्रंथांमध्ये विज्ञानालाही तितकंच महत्त्व देण्यात आलं आहे. विज्ञान आणि धर्म या दोन्ही गोष्टी समाजाच्या उद्धारासाठी आहेत. त्यामुळे विज्ञानवादी आणि धार्मिक लोकांनी एकत्र येऊन समाजाचं कल्याण केलं पाहिजे. दोघांनी एकमेकांना कमी लेखू नये. स्वतःचं महत्त्व वाढवू नये. एकमेकांच्या सहाय्याने पुढे जायला हवं.

बोध

# नागपूरकर वोट कर...बाईक रॅलीमधून मतदानाचा संदेश

## नागपूरकरांच्या निर्धाराने मतदानाचे लक्ष्य प्राप्त होणार : डॉ. रवींद्रकुमार सिंगल

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. १७ :**

नागपूरकर वोट कर.. असा संदेश देत नागपूर महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांनी बाईक रॅली मधून नागपूर शहरातील जनतेला मतदानाचा संदेश दिला. या रॅलीमध्ये सहभागी होऊन पोलीस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल, निवडणूक निरीक्षक श्री. सुनीलकुमार सिंग, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विनायक महामुनी यांनी सहभागींचा उत्साह वाढविला. नागपूरकरांच्या मतदानाच्या निधार्रामुळे यावेळी ७५टक्के मतदानाचे लक्ष्य नक्की प्राप्त होणार, असा विश्वास पोलीस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी व्यक्त केला.



मतदार जनजागृतीसाठी रविवारी (ता.१७) नागपूर महानगरपालिका, जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त पुढाकाराने बाईक रॅली काढण्यात आली होती. मनपा मुख्यालयातून रॅलीला सुरूवात झाली. पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल, मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, निवडणूक निरीक्षक . सुनीलकुमार सिंग, भोर सिंग, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल, अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर यांनी रॅलीला हिरवी झेंडी दाखवली व स्वतः देखील रॅलीमध्ये सहभाग नोंदविला.

मनपा मुख्यालयामधून सुरू झालेली रॅली व्हीसीए चौक, जिल्हाधिकारी कार्यालय, आकाशवाणी चौक, जी.पी.ओ. चौक, जिल्हा परिषद कार्यालय, पोलीस आयुक्त कार्यालय, लेडिज क्लब चौक, जी.एस. कॉलेज चौक, शंकरनगर चौक, झाशी राणी चौक, लोहापुल नवीन अंडर पास, मोक्षधाम चौक, जाटतरोडी (रामबाग), मेडिकल चौक, क्रीडा चौक, सोमवारी कॉर्टर, सक्करदरा चौक, मंगलमूर्ती लॉन चौक, जगनाडे चौक, गंगाबाई घाट चौक, टेलिफोन एक्सचेंज चौक, सी.ए. रोड, मेयो हॉस्पिटल चौक, कडबी चौक पूल, छावणी, सदर या मागार्ने मनपा मुख्यायामध्ये परत आली व रॅलीचे समापन झाले. यानंतर मनपा मुख्यालयातील हिरवळीवर सर्व सहभागींना जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विनायक महामुनी यांनी मतदानाची शपथ दिली.

यावेळी पोलीस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी बॉईक रॅली मध्ये सहभागी सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. असाच उत्साह मतदानासाठी कायम ठेवून इतरांनाही त्यासाठी प्रेरीत करावे. येत्या २० नोव्हेंबर रोजी अशाच उत्साहाने मतदान करून नागपूर शहरातील मतदानाची टक्केवारी वाढवावी, असे अवाहन देखील त्यांनी केले.

नागपूर जिल्हा निवडणूक निरीक्षक श्री. सुनील कुमार यांनी रॅलीमध्ये सहभागी झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. नागपूर शहराच्या मतदानाची टक्केवारी ७५ टक्क्यांच्या वर वाढविण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने आपल्या कुटुंबातील व्यक्तीसह नातलग, शेजारी या सर्वांना मतदानासाठी प्रेरीत करावे, असे आवाहन त्यांनी केले.

बाईक रॅली मध्ये नागपूर महानगरपालिका उपायुक्त विजय देशमुख, परिवहन व्यवस्थापक विकास जाधव, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, सहायक आयुक्त सर्वश्री श्याम कापसे, हरीश राऊत, प्रमोद वानखेडे, घनश्याम पंधरे, अशोक घारोटे, अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार, क्रीडा अधिकारी डॉ. पीयूष आंबुलकर, राजकुमार मेश्राम यांच्यासह जिल्हा परिषदेचे कर्मचारी तसेच ऑरेंज सिटी रायडर्स क्लब, ह्युमॅनिटी सोशल फाऊंडेशनच्या पूजा मानमोडे आणि चमू या सर्वांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. मनपाच्या महिला कर्मचाऱ्यांनी नऊवारी साडी आणि पारंपरिक वेषभूषा करून बॉईक रॅलीमध्ये सहभागी होऊन ह्यनागपूरकर वोट कर...चे फलक दाखवून जनजागृती केली.

मनपा मुख्यालयातील रॅलीच्या समापन कार्यक्रमाचे संचालन जनसंपर्क अधिकारी श्री. मनीष सोनी यांनी केले व शेवटी त्यांनी आभारही मानले.

# ओयो हॉटेलमध्ये मिळाला तरुणीचा मृतदेह

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. १७ :**

ओयो हॉटेलच्या एका खोलीत 22 वर्षीय तरुणी मृतावस्थेत मिळाल्याने एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच अजनी पोलिस घटनास्थळी पोहोचले. मृतदेह ताब्यात घेऊन तपास सुरू केला आहे. श्रृती रा. महालगाव, असे मृत तरुणीचे नाव असून ती एका गंभीर आजाराने ग्रस्त होती. त्यातूनच तिचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे. पोलिसांना तिच्या खोलीत औषधी आणि वैद्यकीय दस्तावेजही मिळाले आहेत.

### हॉटेलमध्ये जमा केले होते बनावट आधारकार्ड

तपासादरम्यान पोलिसांना धक्कादायक माहिती मिळाली. श्रृती बनावट नावाने हॉटेलमध्ये रहात होती. तिने ओळखपत्र म्हणून हॉटेलमध्ये जे आधारकार्ड जमा केले होते त्यावर तिचे नाव रुचिका जयंता वाघमारे (22) रा. मिलिंदनगर, पाचपावली असे होते. पोलिस तपासात ते आधारकार्ड बनावट असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी श्रृतीची खरी ओळख पटवून तिच्या आत्याशी संपर्क साधला. त्यांना तिच्या मृत्यूची माहिती दिली. आत्याने श्रृतीचा मृतदेह स्विकारण्यास होकार दर्शविला आहे. त्यामुळे शवविच्छेदनानंतर श्रृतीचा मृतदेह आत्याच्या स्वाधिन केला जाईल.

मिळालेल्या माहितीनुसार, गत 13 नोव्हेंबरच्या रात्री 9.30 वाजताच्या सुमारास श्रृती जयवंतनगरातील ओयो हॉटेल एनएस व्हीलामध्ये रहायला आली होती. ती हॉटेलच्या खोली क्र. 103मध्ये थांबली होती. शनिवारी सकाळी एक मित्र श्रृतीला भेटण्यासाठी हॉटेलमध्ये आला. मात्र, खोलीचे दार आतून बंद होते. त्याने दार ठोठावले मात्र, कुठलाच प्रतिसाद मिळाला नाही. श्रृती झोपली असावी, असे गृहित धरुन तो काही वेळपर्यंत स्वागत कक्षात थांबला. श्रृतीला फोन केला असता फोनवरही प्रतिसाद मिळत नव्हता. त्यामुळे त्याला संशय आला. त्याने हॉटेलच्या व्यवस्थापकाला माहिती दिली.

त्यानंतर दुसऱ्या किल्लीने खोलीचे दार उघडले असता श्रृती बेडवर निपचित पडलेली होती. तत्काळ तिला उपचारार्थ रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. श्रृतीच्या मित्राने अजनी पोलिसांना फोन करुन माहिती दिली. अजनीचे पथक हॉटेलमध्ये पोहोचले. तिच्या खोलीमध्ये पोलिसांना विविध प्रकारचे औषध आणि वैद्यकीय तपासणीचे कागदपत्र मिळाले. पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा करुन आकस्मिक मृत्यूची नोंद केली. रुचिकाचा मृत्यू नेमका कशामुळे झाला हे शवविच्छेदनाच्या अहवालावरून स्पष्ट होईल.

श्रृतीने काही वर्षांपूर्वीच घर सोडले होते. वडिलांच्या अंन्त्यसंस्काराला सुद्धा ती उपस्थित नव्हती. दरम्यान तिच्या आईने दुसरा घरठाव केला. ती विविध हॉटेलमध्ये राहायची. तिची प्रॉपर्टी डिलिंगचे काम करणाऱ्या एका युवकासोबत मैत्री झाली.

मित्र अधून मधून तिला भेटायला जायचा. श्रृती गंभीर आजाराने ग्रस्त होती. तिच्यावर औषधोपचारही सुरू होते. तिला व्यसनही होते. मित्र तिची काळजी घेत होता. तिला रुग्णालयातही घेवून जात होता. शुक्रवारी रात्री तिची विचारपूस करण्यासाठी मित्र गेला होता. शनिवारी सकाळी तिला रुग्णालयात नेण्यासाठी पुन्हा तो हॉटेलमध्ये आला होता.

# ओयो हॉटेलमध्ये प्रेयसीच्या माध्यमातून एमडीची विक्री

### मुंबईतील बड्या तस्कराशी ओळख

सूरजला आई-वडील आणि एक भाऊ आहे. तर हर्षाला एक लहान बहिण आहे. वर्षाचे वडील बांधकाम मजूर आहेत. दहावीपर्यंत तिचे शिक्षण झाले आहे. काही वर्षांपूर्वी सूरजची हर्षासोबत ओळख झाली. ओळखीचे रुपांतर मैत्रीत झाले. त्यांची घट्ट मैत्री झाली. सूरज अंमलीपदार्थ विक्रेत्यांच्या संपर्कात आला. त्याची मुंबईतील बड्या तस्करांसह ओळख झाली. तो थेट मुंबईहून एमडी पावडर बोलवायचा आणि नागपूरातील तरुण, तरुणींसह मागणीप्रमाणे ग्राहकांना पुरवित होता.

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :**

शहरातील वेगवेगळ्या आयो हॉटेलमध्ये थांबून तरुण-तरुणींना एमडी पावडरच्या आहारी लावणाऱ्या बंटी बबलीच्या बेलतरोडी पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. वरिष्ठ पोलिस निरीक्षक मुकुंद कवाडे यांचे पथक मागील काही दिवसांपासून त्यांच्यावर पाळत ठेवून होते. अतिशय गोपनिय पद्धतीने माहिती गोळा करून मनीषनगरातील ओयो हॉटेल श्रद्धा इनच्या खोली नंबर 202 मध्ये धाड टाकली. पंचासमक्ष झडती घेतली असता त्यांच्या जवळ 17 हजार रुपये किंमतीचे सात ग्रॅम एमडी पावडर मिळाले. सूरज गुफावार (27) रा. छोटा ताजबाग आणि हर्षा भगत (27) रा. विश्वकर्मानगर, अजनी अशी अटकेतील एमडी विक्रेत्यांची नावे आहेत. अंमलीपदार्थ विक्रीसाठी सूरजने हषार्ला सोबत घेतले. आमचे लग्न झाले असून कुटुंब चालविण्यासाठी भाजी विक्रीचा व्यवसाय करतो. लग्नाला घरच्यांचा विरोध असल्याने बरेचदा हॉटेलमध्ये थांबण्याची वेळ येते. अशी बतावणी करून ते दोघेही शहरातील वेगवेगळ्या हॉटेलमध्ये थांबून मागणीनुसार ग्राहकांना एमडी पावडर पुरवित होते. यासंदर्भात पोलिस उपायुक्तांना माहिती मिळाली. त्यांनी वरिष्ठ पोलिस निरीक्षक कवाडे यांना कारवाईचे निर्देश दिले. वपोनि कवाडे यांच्या पथकाने बंटी बबलीचा पत्ता शोधून त्यांच्यावर पाळत ठेवली. दोघेही मनीषनगरातील हॉटेलमध्ये थांबले असून ग्राहकांना अंमलीपदार्थ पुरवित असल्याची माहिती कवाडे यांना मिळाली. त्यांनी पथक तयार करून हॉटेलच्या खोली नंबर 202 मध्ये धाड टाकली. सरकारी पंचा समक्ष झडती घेण्यात आली. पहाटेपर्यंत कारवाई सुरू होती. त्यांच्या ताब्यातून अंमलीपदार्थाह, मोटारसायकल, दोन मोबाईल आणि रोख असा एकूण 3 लाख 40 हजार 500 रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना एनडीपीएस अन्वये गुन्हा नोंदवून अटक करण्यात आली.

# विद्यार्थ्यांचा स्नेह मिलन कार्यक्रमाचे आयोजन

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. १७ :**

छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था द्वारा संचालित, रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथे माजी विद्यार्थ्यांच्या स्नेह मिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे संचालक डॉ. मारोती वाघ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एस. वानखेडे, आय.क्यू.एस.सी समन्वयक प्रा. पंकज झगडे, प्रमुख अतिथी देवमन कांबळे (प्राचार्य नवप्रतिभा कॉलेज, नागपूर), बीसीसीए विभाग प्रमुख प्रा. किरण पांडे, बीबीए विभाग प्रमुख तथा राष्ट्रसेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी डॉ.अर्चना पत्की, कला शाखा विभाग प्रमुख प्रा. सायली लाखे पिदळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सरस्वती मातेचे पूजन आणि मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. संगीत विभागाद्वारे प्रा.देशमुख आणि प्रा. रोठे आणि चमू यांच्याद्वारे शब्द सुमनांनी स्वागत करण्यात आले.

संस्थेचे संचालक आदरणीय डॉ.वाघ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत पुढील वाटचालीसाठी अनेकानेक शुभेच्छा दिल्यात. विद्यार्थ्यांनी आपण करीत असलेल्या कायार्चा आढावा दिला आणि मुक्तपणे संवाद साधला. या कार्यक्रमाचे नियोजन महाविद्यालयातील बीए, बीसीसीए आणि बीबीए या शाखांद्वारे आणि एनएसएस विभागाद्वारे करण्यात आले होते.

# डिलिव्हरी व्हॅनमध्ये १४ कोटींचे सोने-चांदी मिळाले

### अमरावती मार्गावर अंबाझरी पोलिसांची कारवाई

**नागपूर :** अंबाझरी पोलिसांनी गोपनिय माहितीवरून अमरावती मार्गावर नाकाबंदी करून एक डिलिव्हरी व्हॅन थांबवली. झडतीमध्ये त्यात जवळपास 14 कोटी रुपये किंमतीचे सोने-चांदी मिळून आले. घटनास्थळी प्राथमिक चौकशीत वाहनचालकाने सोने-चांदी संदर्भात सर्व कागदपत्रे सादर केली आहेत. मात्र, मोठ्या प्रमाणावर सोने-चांदी असल्याने सखोल चौकशी केली जात आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी सर्व परिमंडळाचे पोलिस उपायुक्त आणि वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना चोख बंदोबस्तासह संशयित वाहनांवर लक्ष ठेवण्याचे आदेश दिले आहे. त्यामुळे सर्व वरिष्ठ पोलिस निरीक्षकांनी त्यांच्या ठाण्यांतर्गत नाकाबंदी करून वाहनांची झाडा-झडती सुरू केली आहे. दरम्यान अंबाझरी पोलिसांना एका डिलिव्हरी व्हॅनने इतवारीतील एका सराफाचे 17 किलो सोन्याचे बिस्किट आणि 55 किलो चांदी (अंदाजे किंमत 14 कोटी) अमरावतीला घेवून जात असल्याची गोपनिय माहिती मिळाली. या माहितीवरून ठाणेदार गोल्हे यांनी अमरावती मार्गावर कॅम्पस बायपास रोडवर नाकाबंदी करून व्हॅन थांबविली. व्हॅनच्या झडतीमध्ये पोलिसांना मोठ्या प्रमाणात सोने आणि चांदीचे बॉक्स मिळाले. कागदपत्रांची मागणी केली असता चालकाने त्यासंबधीचे सर्व कागदपत्रे सादर केली आहेत. मात्र पोलिस खबरदारी म्हणून या संबंधात सखोल तपास करीत आहे. सोने-चांदीची जीएसटी भरली की नाही. आयकर विभागाची त्यावर आपत्ती तर नाही यासह पुढील माहिती जाणून घेण्यासाठी चालकाला ठाण्यात आणून चौकशी केली जात आहे. दरम्यान या संबंधात निडणूक आयोगाचे भरारी पथक, जीएसटी आणि आयकर विभागाच्या पथकालाही माहिती देण्यात आली आहे. रात्री उशिरापर्यंत चौकशी सुरू होती.

एक किलोपेक्षा अधिक सोने-चांदी एका शहरातून दुसऱ्या शहरात नेण्यासाठी निवडणूक आयोगाची परवानगी घ्यावी लागते. मात्र, ही परवानगी डिलिव्हरी व्हॅनचा चालक सादर करू शकला नाही, अशी माहिती वपोनि गोल्हे यांनी दिली.

# नागपूर गार्डन क्लब आणि द हितवादच्या संयुक्त विद्यमाने लाल फुलांचा शो



■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. १७ :**

नागपूर गार्डन क्लब आणि द हितवाद यांच्या संयुक्त विद्यमाने लाल फुलांचा शो २०२४ याचे आयोजन, १ ५ नोव्हेंबरला धरमपेठ कन्या शाळा, उत्तर अंबाझरी रोड, येथे संपन्न झाला . दरवर्षी भारताचे प्रथम पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा शो आयोजित करण्यात येतो. अनेक शाळांच्या मुलांनी या शोमध्ये सहभाग घेतला. यामध्ये विद्यार्थ्यांना पुरस्कार प्राप्त झालेत.

गुलाबाचे एक लाल फुल आणि लाल गुलाबाशिवाय इतर कुठलेही लाल रंगाचे फुल तेजस्विनी उईके, रक्षंदा शहारे, स्वरा उदासी, श्रद्धा श्रीनिवास, सोफिया तुरांगळे लाल फुलांचा गुच्छ यानवी रामानी, सोफिया तुरांगळे, रक्षंदा शहरे, स्वरा उदासीवय वर्ष ८ ते १२ पर्यंतच्या मुलांनी केलेली फुलांची मांडणी श्रीमही गभणे, आणि वृत्तीका तळेगावकर, शिवाजी वांद्रे, अथर्व अग्रवाल, युतीका यावलकर, वंशिका उदासी ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल शाळा, लावा, नागपूर या शाळेने जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतल्याबद्दल तसेच जास्तीत जास्त बक्षिसे मिळवल्याबद्दल विशेष पारितोषिक प्राप्त केले.

या शोसाठी परीक्षक म्हणून डॉ. राजश्री बापट,समित आदमने आणि नितीन दाते यांनी जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडली नागपूर गार्डन क्लबचे संस्थापक सदस्य असलेल्या रमेश खानझोडे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ या शोची बक्षिसे डॉ. विजया खानझोडे यांच्यातर्फे पुरस्कृत करण्यात आली होती.

यासाठी नागपूर गार्डन क्लबच्या अध्यक्षा अनुजा परचुरे यांनी विशेष प्रयत्न केले. ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल शाळा, लावा, नागपूर यांच्यातर्फे सहभाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना पुस्तके वितरित करण्यात आली.

तसेच नागपूर गार्डन क्लब तर्फे तुळशीची रोपे वितरित करण्यात आली. सांस्कृतिक कार्यक्रम पूजा काठोळे यांनी, तसेच बक्षीस वितरण समारंभ डॉ. राजश्री बापट यांनी समर्थपणे पार पाडला.

# निवडणुकीच्या प्रचारात विदर्भाच्या प्रश्नांनाच बगल

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. १७ :**

विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा अखेरचा टप्पा सुरू झाला, मात्र ज्या विदर्भाच्या हातात सत्तेची चावी आहे त्या विदभार्चेच प्रश्न निवडणुकीच्या प्रचारातून तसेच पक्षाच्या आणि उमेदवाराच्या जाहीरनाम्यातून बाद असल्याचे दिसत आहेत. ही बाब अत्यंत गंभीर असून विदभार्साठी घातक असल्याचा आरोप विदर्भवादी शेतकरी नेते जननायक प्रकाश पोहरे, विदभार्चे कट्टर समर्थक श्रीनिवास खांदेवाले आणि ॲड. अविनाश काळे यांनी केला आहे. विदर्भात निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने आणि पक्षानी विदर्भाच्या मुद्यांवर आणि वेगळ्या विदभार्संदर्भात आपली भूमिका जाहीर करावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे. कुठल्याच राजकीय पक्ष्यांनी त्यांच्या जाहीरनाम्यात विदभार्संदभार्तील अनेक प्रश्नासंदर्भात काहीच उल्लेख केलेला नाही विदभार्तील मतदारांनी मतं मागण्याकरिता जे कुणी उमेदवार येतील त्यांना विदभार्तील नागरीकांनी उमेदवारांना वरील प्रश्न विचारावेत. तसेच उमेदवारांनी आणि पक्षांनी आपल्या जाहिरनाम्यात या प्रश्नांच्या उत्तरांचा समोवश करावा अशी मागणी विदभार्वासियांनी केली आहे.

# "रुंजी आणि मोहोळ" या दोन गीत-गझल संग्रहांचा लोकार्पण

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. १७ :**

नागपुरातील सुपरिचित कवी-गझलकार अ्ड. माधव बोबडे यांच्या रुंजी आणि मोहोळ या दोन गीत-गझल संग्रहाचे लोकार्पण करण्यात आले.हा कार्यक्रम अर्पण सभागृह मोर भवन येथे संपन्न झाला. महाराष्ट्राच्या पहिल्या महिला गझलकार, आशा पांडे कार्यक्रमाला अध्यक्षा म्हणून लाभल्या होत्या. प्रमुख अतिथी कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे पूर्व कुलगुरू डॉ. पंकज चांदे आणि सुविख्यात गझलकार बबन सराडकर उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून ॲड. नितीन खांबोरकर, अमिषा प्रकाशानाचे प्रमुख अविनाश बागडे, सुप्रसिद्ध गजल गायक सुरेश दंडे तथा सुविख्यात संगीतकार मनीष उपाध्ये हे लाभले होते. प्राचार्या उज्वला अंधारे आणि सुपरिचित लेखिका भारती भाईक यांनी मोहोळ आणि रुंजी यातील काही कवितांवर रसग्रहण केले.




दीप प्रज्वलानंतर ॲड. माधव बोबडे आणि श्रीमती बोबडे यांनी अतिथींचे शाल आणि श्रीफळ देऊन स्वागत केले. कार्यक्रमाचे संचालन नयना जोशी गाथू यांनी केले. अविषा प्रकाशन प्रमुख अविनाश बागडे आणि चित्रकार सी. डी. शिवणकर व्यंगकार अनिल मालकर आणि साहित्यकार संतोष बादल यांनी गौरव पत्र देऊन ॲड. माधव बोबडे यांना सन्मानित केले.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या भागात सुप्रसिद्ध गायक संगीतकार सुरेश दंडे आणि मनीष उपाध्ये यांनी पुस्तकातील काही रचना प्रस्तुत केल्या, ज्या त्यांनीच कंपोज केल्या होत्या. तबल्यावर रमेश ऊईके आणि व्हायोलीनवरअमर शेंडे यांनी त्यांना साथदिली. शहरातील अनेक गणमान्य विभूती कार्यक्रमाला उपस्थित होत्या.

विशेषतः जॉईंट पोलीस कमिशनर आणि इलेक्शनच्या निमित्ताने शहरात असलेले दीपक गवई यांनी कार्यक्रमाला भेट दिली निवृत्त न्यायाधिश मंजुषा भगाडे, निवृत्त पब्लिक सर्विस कमिशन ऑफिसर सुरेखा चौबे,निवृत्त आयबी ऑफिसर गुजरात अजय दिघडे इत्यादी मान्यवरांसह दत्तू पवनीकर, ज्योती गजभिये, रुबी दास, देवयानी बॅनर्जी, पुनम मिश्रा दिलीप भूषण सत्यजित सेन, शशांक दंडे, हेमंत पेशकर, नाना मिसाळ आणि प्राध्यापक अनिल भाईक तसेच प्रसून सोनवलकर इत्यादी मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

# वाहन चालकांनी रस्ता सुरक्षेचा मंत्र कायम राखावा

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. १७ :**

रस्ता वाहतूक बळींचा जागतिक स्मरण दिनानिमित्त शहर प्रादेशिक परिवहन कार्यालय तर्फे शिवाजीनगर येथील एम. वझलवार ड्रायव्हिंग स्कूल येथे मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. शिबीरात विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा व अपघात नियंत्रण या विषयावर मौलिक मार्गदर्शन करण्यात आले. रस्त्यावरील शिस्त हीच आपली प्राथमिक असल्याने रस्त्यांवर वाहन चालविताना रस्ता सुरक्षेचा मंत्र कायम राखवा, असे आवाहन नागपूर परिवहन विभागाचे अधिकारी होमेश काळे यांनी व्यक्त केले.




एम. वझलवार ड्रायव्हिंग स्कूलच्या वतीने दरवर्षी विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबीर घेण्यात येते. यंदाच्या शिबीरात प्रामुख्याने नागपूर परिवहन विभागाचे अधिकारी राहुल वंजारी, अनिल खुटेमाटे, आनंद पाचपोर, प्रफुल्ल नगराळे, संचालक मनीष वझलवार आदी मोठया संख्येने उपस्थित होते. नव्याने वाहन चालवित असलेल्या अठरा वर्षावरील युवकांनी वाहतूक नियमाचे पालन करावे.

कोणताही अपघात हा आपणास सांगून होत नसतो. त्यामुळे सतर्कता बाळगावी. रस्ते अपघातात आपले मित्र, नातेवाईक कुटुंबियांवर दुखःचा डोंगर कोसळतो. त्यामुळे याकडे गंभीरपणे लक्ष देण्याची गरज नागपूर परिवहन विभागाचे अधिकारी राहुल वंजारी यांनी व्यक्त केली.

नोव्हेंबरचा तिसरा रविवार हा रस्ता वाहतूक बळींचा जागतिक स्मरण दिन म्हणून दरवर्षी, साजरा करण्यात येतो. रस्ते सुरक्षित करण्यासाठी सरकार आणि समाजातील वैयक्तिक सदस्यांना त्यांच्या जबाबदारीची आठवण करून देण्याचा उद्देश आहे. रस्ते वाहतूक अपघातांमुळे दरवर्षी अंदाजे १.१९ दशलक्ष लोक मरतात. सर्व रस्ते वाहतूक मृत्यूंपैकी अध्यार्हून अधिक मृत्यू हे पादचारी, आणि मोटारसायकलस्वारांसह असुरक्षित रस्ता वापरकर्त्यांमधील आहेत.

नॅशनल हायवे ट्रॅफिक सेफ्टी ॲडमिनिस्ट्रेशनच्या अहवालानुसार ९४ टक्के ट्रॅफिक अपघातांमध्ये वाहन चालकाची चूक कारणीभूत ठरते. विचलित ड्रायव्हिंग हा वाहतूक अपघातांचा एक प्रमुख घटक आहे. वेग जितका जास्त तितका धोका जास्त. २०२२ मध्ये रस्ते अपघातांच्या मागील वर्ष २०२१ च्या तुलनेत टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्याचप्रमाणे रस्ते अपघातांमुळे मृत्यू आणि जखमींच्या संख्येतही अनुक्रमे ९.४ आणि १५.३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. या आकडेवारीवरून देशात दररोज सरासरी १,२६४ अपघात आणि ४६२ मृत्यू किंवा दर तासाला ५३ अपघात आणि १९ मृत्यू होतात.

शासनाने वाहतुकीचे नियम कडक केले असून नियमांचे उल्लंघनासाठी दंड वाढविला आहे. मंत्रिमंडळाने राष्ट्रीय रस्ता सुरक्षा धोरण मंजूर केले. भारत सरकारने २०३० पर्यंत रस्त्यावरील मृत्यू व जखमीचे प्रमाणे कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने जनजागृती मोहीम हाती घेतली असल्याची माहिती संचालक मनीष वझलवार यांनी दिली.



# एक हैं तो सेफ़ हैं

शिवसेना

भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र

Published By: Bharatiya Janata Party, Maharashtra | C.D.O Barrack No. 1, Nariman Point, Mumbai- 400020

*Matter related to "Clock" symbol of the NCP is sub-judice in the Supreme Court.